**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५३३

दिनांक ०३-१०-२००७

श्री. सुभाष मारोती कावळे, : अपिलार्थी
मु. करेवाडी, पो. मोहा, तालुका परळी
वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुभाष मारोती कावळे, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार हे कोणीही हजर नाहीत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे करेवाडी येथील स्वस्त धान्य दुकानाच्या

संदर्भात दिलेल्या दिनांक २०-०३-२००६ च्या तक्रारीच्या अर्जासंदर्भात केलेल्या चौकशीची व कारवाईचा अहवाल या संदर्भातील माहिती मागितली होती.

अपिलार्थीने माहितीचा कालावधी मार्च २००६ ते १७-०७-२००६ असा दर्शविला असून ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांना केलेल्या या अर्जासोबत तहसीलदार परळी यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या दिनांक २०-०३-२००६ च्या अर्जाची प्रत सोबत जोडली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०८-२००६ रोजी प्रथम उत्तर दिले. या उत्तरामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधीत शाखेच्या अव्वल कारकूनाकडून त्यांच्याकडील दिनांक १८-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये मागितली होती परंतु सदर माहिती विहित कालावधीत त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीस अनुसरुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली असून आपली मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची सुनावणी अद्यापही घेतली नसल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-१०-२००६ रोजी

व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) मधील तरतुदी प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश देण्यास आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची पाहणी करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी तहसीलदार परळी यांच्याकडे दिनांक २०-०३-२००६ रोजी करेवाडी गावामधील स्वस्त धान्य दुकानदार श्री. बळीराम नागोराव अनुसे यांनी धान्य, रॉकेल वाटपात केलेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचारासंदर्भात तक्रार केली होती. या तक्रारीची सद्यस्थिती जाणून घेण्याची अपिलार्थी यांची इच्छा आहे व त्याकरिता त्यांनी संबंधीत स्वस्त धान्य दुकानदारा विरुध्द केलेल्या तक्रारी संदर्भात करण्यात आलेल्या कारवाईचा अहवाल माहिती अधिकार अधिनियमाव्दारे मागितला आहे. अपिलार्थीने तहसीलदार परळी यांच्याकडे केलेल्या या अर्जाचे अवलोकन केले असता धान्य दुकानदार बळीराम नागोराव अनुसे यांनी शासनाची फसवणूक करुन धान्य व रॉकेल काळ्या बाजारात विकल्याचे भ्रष्टाचार केल्याचे पुराव्यासह तहसीलदार यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. अपिलार्थीने या अर्जामध्ये केलेल्या तक्रारीचे स्वरुप पाहता त्यामध्ये केलेले आरोप हे गंभीर स्वरुपाचे असून त्यांची तालुक्यातील प्रशासकीय प्रमुख या नात्याने संबंधीत तहसीलदार यांनी तात्काळ दखल घेणे अपेक्षित होते. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलावरुन त्यांच्या तक्रार अर्जाची संबंधीत तहसीलदार यांनी आवश्यक त्या गांभीर्याने दखल घेतल्याचे दिसून येत नाही. एवढेच नव्हे तर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल केले गेलेले अपील देखील त्यांनी अद्यापपर्यंत सुनावणीस ठेवलेले नाही. त्यांच्या या प्रकरणातील अशा प्रकारच्या वर्तनावरुन यावरुन त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाई वृत्ती, निष्काळजीपणा पुरेशा प्रमाणात स्पष्ट होत आहे असे आयोगाचे मत आहे.

सदर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेले दिनांक १६-०८-२००६ चे उत्तर म्हणजे त्यांच्या माहिती अधिकार अधिनियमाविषयीच्या त्यांच्या अनाभिज्ञतेचा बेपवाईचा, व निष्काळजीपणाचा मुर्तीमंत नमुना आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर संबंधीत जन माहिती अधिका-याकडे ५ दिवसात पाठवून त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावयास हवे होते किंवा स्वतः संबंधीत जन माहिती अधिका-याकडे जाऊन अपिलार्थीस ही माहिती द्यावयास हवी होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी तहसीलदार यांच्याकडे केलेल्या अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये परळी तालुक्यातील धान्य वितरण व्यवस्थेबाबत गंभीर व भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. या आरोपाचे गांभीर्य लक्षात घेता व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची या प्रकरणातील मानसिकता पाहता त्यांच्याकडून या प्रकरणी ठोस कारवाईची अपेक्षा करणे धाष्ट्र्यचे ठरेल असे आयोगाचे मत आहे.

तेव्हा जिल्हाधिकारी बीड यांनी या प्रकरणी स्वतः लक्ष घालून अपिलार्थीने तहसीलदार परळी यांच्याकडे केलेल्या दिनांक २०-०३-२००६ च्या अर्जाची स्वतः चौकशी करावी व आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत सादर करावा व याच बरोबर या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अयोग्य माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा सिध्द केल्यामुळे त्यांच्यावर महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा असे आदेशित करण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली

माहिती, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी असेही पुढे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अयोग्य माहिती देऊन आपल्या कार्यशैली-तील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा सिध्द केल्यामुळे त्यांच्यावर महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा.

४. जिल्हाधिकारी बीड यांनी अपिलार्थीने तहसीलदार परळी यांच्याकडे केलेल्या दिनांक २०-०३-२००६ च्या अर्जाची स्वतः चौकशी करावी व आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष मारोती कावळे, मु. करेवाडी, पो. मोहा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५३५

दिनांक ०४-१०-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. हनमंत काशीराव देशमुख,<br>मु. पो. देशमुख गल्ली, भोकर,<br>तालुका भोकर, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा माहिती अधिकारी तालुका कृषि<br>अधिकारी कार्यालय, लोहा,<br>तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, लोहा,<br>तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| सध्या : | जन माहिती अधिकारी | : | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हनमंत काशीराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका

कृषि अधिकारी कार्यालय श्री. नारायण टिकाराम गुट्टे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. पांडुरंग नारायणराव ब्याळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २८-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रा-तील कामासाठी धान्य योजनेच्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. " गोलगाव सी. सी. टी. चे काम किती मिटर झाले, कामाची एम. बी. व मजूरी मस्टर रजिस्टरच्या सत्यप्रती,

२. वडेपूरी (एन. बी. नाला बंडींग) मजूरी मस्टरच्या सत्यप्रती देणे,

३. (माणिका कोंडिबा वळे यांच्या शेताजवळील एन. बी.)
वडेपूरी सी. सी. टी. कामाची एम. बी. व मजूरी मस्टर रजिस्टरच्या सत्यप्रती व सी. सी. टी. चे काम किती झाले. "

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही. तदनंतर अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपिल जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाले नाही असे जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. तथापि अपिलार्थीने सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविल्याप्रित्यर्थ अंडर सर्टिफिकेट ऑफ

पोस्टींगची त्यांच्याकडील एक स्थळप्रत आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील अर्ज केला असल्याचे सिध्द होते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिला मध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, लोहा तालुक्यातील कामासाठी धान्य योजनेतंर्गत कृषि विभागातर्फे एकूण २ कोटी ८० लक्ष रुपयांची ६५ कामे करण्यात आली. त्यामध्ये कृषि विभागाने १ कोटी रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे व हा भ्रष्टाचार लपविण्यासाठी त्यांनी मागितलेली माहिती १५ महिने इतका कालावधी ओलांडून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी हे त्यांना ती माहिती देत नाहीत. त्यांनी केलेल्या भ्रष्टाचारामुळे तालुक्यातील शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्तीची व खातेनिहाय चौकशी-ची कारवाई करण्याची शिफारस आयोगाने शासनास करावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या पदाचा दिनांक ०१-१०-२००७ रोजी पदभार स्विकारल्यामुळे त्यांना या आधी काय घडले हे काहीही सांगता येत नाही त्यामुळे अपिलार्थीस ते माहिती देऊ शकत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक २९-०९-२००७ रोजी अपिलार्थीस श्री. रेड्डी कृषि पर्यवेक्षक यांच्यामार्फत देऊ केली असता अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले तर अपिलार्थीचे म्हणणे असे की, रेड्डी नावाची कोणीही व्यक्ती त्यांच्याकडे माहिती घेऊन आली नव्हती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे करण्यात आलेला वरील युक्तिवाद पाहता अपिलार्थीस जी माहिती दिनांक २७-०७-२००६ रोजी अगर त्यापुर्वी मिळणे माहिती अधिकार अधिनियमाव्दारे अभिप्रेत आहे ती माहिती मूळातच प्रथमतः दिनांक २९-०९-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे देऊ केली गेली म्हणजे विहित कालावधीपेक्षा अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी १४ महिने इतका असमर्थनीय विलंब लावला असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. कृषि खात्याच्या उपस्थित प्रतिनिधीमार्फत असा युक्तिवाद करण्यात आला की, लोहा तालुक्यात गोलगाव नावाची २ गावे असून यापैकी निश्चितपणे कोणत्या गोलेगावातील कामाविषयी माहिती हवी आहे असे त्यांनी अपिलार्थीस विचारले कारण या २ गावामधील एका गोलगावामध्ये वन विभागामार्फत काम झाले होते व दुस-या गावात कोणतेही काम शेतकी खात्यातर्फे करण्यात आले नव्हते. जन माहिती अधिका-यातर्फे जरी गोलगाव गावच्या कामासंदर्भातील माहिती देण्यासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधात थोडीशी कारवाई झाली असली तरी वडेपूर गावाच्या कामासंदर्भात विहित मुदत टळून गेल्यानंतर देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही हे सत्य शेवटी उरतेच आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कोणाही नागरिकाने सार्वजनिक प्राधिकरणाकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीकरिता अर्ज करणे हा त्या नागरिकाचा हक्क असून त्या नागरिकास विहित मुदतीत माहिती देणे हे संबंधीत शासकीय प्राधिकरणातील जन माहिती अधिका-याचे आद्य कर्तव्य आहे हे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होते. कृषि खात्याच्या अधिका-यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०९-२००७ रोजी ही माहिती व्यक्तिशः देऊ केली असता अपिलार्थीने

ती स्विकारली नाही.  अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये माहिती टपालाव्दारे मागितली असतांना अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तिशः देण्याचे काही प्रयोजन नव्हते. यावरुन देखील अपिलार्थीने मागितलेली माहिती विहित मुदतीत तयार केली गेली नल्याचे सिध्द होत आहे.  अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत न देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणेचा अभाव स्पष्ट तर केलाच आहे परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) नुसार कारवाई करण्यास लागणारी आपली आवश्यक ती पात्रता पूर्णपणे सिध्द केली आहे.  जन माहिती अधिका-यास या प्रकरणी माहिती देण्यासंदर्भात सहाय्य करण्यासाठी जे इतर अधिकारी / कर्मचारी जबाबदार असतील त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणूनच समजावे अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे.  तेव्हा असे आदेशित करण्यात येते की -- या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांना व सदर माहिती त्यांना देण्यासाठी जबाबदार असणा-या इतर सर्व अधिका-यांना प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण २५००० रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे.  या रकमेचा भरणा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाचे आत शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षा खाली करावा व त्याचबरोबर त्यांना पुढे असेही आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे इतर सर्व अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे निश्चित केलेल्या विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० रुपयाची शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षा भरावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर सात दिवसाचे आत सादर करावा.

४. आयुक्त (कृषि) पुणे यांनी वरील मुद्दा क्रमांक ३ च्या आदेशाचे विहित मुदतीत अनुपालन होईल हे पहावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हनमंत काशीराव देशमुख, मु. पो. देशमुख गल्ली, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५३९

दिनांक ०४-१०-२००७

श्री. राठोड गंगाराम सखाराम, : अपिलार्थी

मु. पो. खोराड सावंगी, तालुका मंठा

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, सिंचन

विभाग, परतूर, तालुका परतूर,

जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे,

सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जालना

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी राठोड गंगाराम सखाराम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघु पाटबंधारे, सिंचन विभाग व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, सिंचन विभाग हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १५-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक एप्रिल २००६ ते १५ जून २००६ या कालावधीतील मंठा तालुक्यातील रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामांसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ मंठा तालुक्यातील नावासहीत लेबर रिपोर्ट झेरॉक्स प्रती मिळण्याबाबत.”

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

सदर अर्जावरुन अपिलार्थीस मंठा तालुक्यातील रोहयोच्या कामाच्या उपरोक्त कालावधीतील मस्टरच्या झेरॉक्स प्रती हव्या असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याच प्रकारचा प्रतिसाद आजतागायत दिलेला नाही असे आयोगासमोर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००६ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले असून या प्रथम अपीलामध्ये आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर त्यांच्याकडील दिनांक ०२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर सुनावणी दिनांक १२-०९-२००६ रोजी घेण्यात येईल असे कळविले. या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे गैरहजर होते व अपिलार्थी हे हजर होते असा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयामध्ये आहे. त्याच बरोबर याच अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०८-२००६ रोजी सुनावणी घेतली असता त्याही वेळी जन माहिती अधिकारी गैरहजर राहिल्याचे या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी निदर्शनास आणले आहे. या सुनावणीचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००६ रोजी दिला असून त्यामध्ये जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झाल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणताही ठोस आदेश या अपील निर्णयामध्ये नाही. जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक २६-०९-२००६ चे आदेश म्हणजे अपील कसे ठरवू नये याचा उत्तम नमुना आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये. अपील ठरवितांना जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून

व नोंदवून घेऊन आपला अंतीम निर्णय देणे, “ अपील ठरविणे ” या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी जरी अपिलार्थीचे म्हणणे ऐकून घेतले असले तरी अंतीमतः कोणताही ठोस निर्णय या अपिलामध्ये दिलेला नाही. या प्रकरणी घडलेल्या चुकांची पुनरावृत्ती इतःपर घडू नये अशी दक्षता त्यांनी घ्यावी असे आयोगातर्फे त्यांना सुचविण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २७-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या विनापरवानगी गैरहजेरीची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे. अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांना त्यांनी मूळ अर्जात मागणी केलेली माहिती विनामूल्य हवी आहे. जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागातील भ्रष्टाचार जनतेच्या समोर उघडकीस आणण्यासाठी त्यांना ही माहिती हवी आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांचा कोणत्याही स्वरुपातील युक्तिवाद अथवा म्हणणे आयोगास आजतागायत प्राप्त झालेले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे टाळाटाळ केली आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत मूळ माहिती दिली तर नाहीच परंतु ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क किती लागेल हेही अपिलार्थीस कळविण्याची तसदी घेतली नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाच्या या विषयाच्या संदर्भात घेतलेल्या

अपील सुनावणीच्या वेळी देखील ते विना परवानगी गैरहजर राहिले. आज आयोगासमोर घेतलेल्या सुनावणीस देखील ते विनापरवानगी गैरहजर राहिले आहेत. यावरुन त्यांना अपिलार्थीस, त्यांनी मागितलेली माहिती देण्यास खरोखरच स्वारस्य आहे किंवा कसे याबाबत संभ्रम निर्माण होत आहे. तसेच त्यांच्या या प्रकरणातील सुनावणीमध्ये सततच्या अनुपस्थिती-मुळे त्यांना पुरेशी संधी देऊनही त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची इच्छा दिसून येत नाही. त्यांच्या या कृतीने त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाप्रती त्यांच्या मनात असलेला अनादर तर व्यक्त केलाच आहे परंतु याच बरोबर आपल्या कार्य शैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव, बेपर्वाई यांचे पुरेपूर दर्शन घडविले आहे. अशा प्रवृत्तींना वेळीच आळा न घातल्यास त्या पुढे फोफावत जाऊन माहिती अधिकार कायद्यासारख्या महत्वपूर्ण कायद्याला निष्प्रभ ठरवतील व परिणामी ज्या उद्देशाने हा कायदा संपूर्ण देशात जारी केला आहे त्या उद्देशावरच एक प्रकारे घाला पडेल की काय अशी शंका येते. तथापि या कायद्याचे मूळ उद्दीष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घालणे हे आयोगाचे प्रथम कर्तव्य आहे असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचन पाहता जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा निःसंशयपणे भंग केल्याचे दिसून येते. त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठी अर्ज केल्यानंतर सुमारे १५ महिन्याचा कालावधी ओलांडूनही अपिलार्थीस या संदर्भात काही कळविण्याची तसदी घेतली नाही व पुढे जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाच्या सुनावणीस वीनापरवानगी गैरहजर राहत आहेत हे पाहता ते निःसंशयपणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) च्या तरतुदीस पात्र असल्याचे सिध्द होत आहे.

तेव्हा असे आदेशित करण्यात येते की :

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर, ७ दिवसाच्या आत साक्षांकीत करुन विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या कर्तव्य परायणेच्या अभावाबद्दल व बेपवाईबद्दल त्यांचेवर सचिव (जलसंपदा) यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) याप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

अपिलार्थीस अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे रुपये २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत करावा. जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर या संदर्भातील पूरक निर्णय आवश्यक वाटल्यास, आयोगातर्फे अलाहिदा जाहीर करण्यात येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर, ७ दिवसाच्या आत साक्षांकीत करुन विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या कर्तव्य परायणेच्या अभावाबद्दल व बेपवाईबद्दल त्यांचेवर सचिव (जलसंपदा) यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर दोन महिन्याचे आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राठोड गंगाराम सखाराम, मु. पो. खोराड सावंगी, तालुका मंठा जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, सिंचन विभाग, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

१.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५४१

निकाल दिनांक ०५-१०-२००७

श्री. मनिष सुर्यकांतराव कुलकर्णी, : अपिलार्थी
व्दारा एल. बी. देशमुख यांचा वाडा,
नरसिंह गल्ली, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मनिष सुर्यकांतराव कुलकर्णी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद श्री. निसार अहेमद खान (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा यांचे प्रतिनिधी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) श्री. शिवाजी दत्तात्रय कपाळे हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०९-२००६ रोजी त्यांच्या कडील अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. “ किती शिक्षण सेवकांची भरती करण्यात आली. वर्षनिहाय संख्या द्यावी.

२. किती शिक्षण सेवकांची बदली करण्यात आली (कालावधी पूर्ण होण्याआधी) कृपया माहिती द्यावी. अनुक्रमांक, शि. नांव, नेमणूक दिनांक, नेमणुकीची शाळा, बदलीने दिलेली शाळा.

३. तीन वर्षाच्या कालावधीत किती शिक्षणसेवकांनी दीर्घ मुदती रजा घेतली. अनुक्रमांक, शिक्षणसेवकांचे नांव, नेमणूक दिनांक, घेतलेल्या रजेचा कालावधी, उपस्थित दिनांक या नमुन्यात माहिती द्यावी. ”

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली असून अपिलार्थीने आपल्या अर्जात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या कालावधीचा कोणताही विशिष्ट असा उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००६ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस पोस्टाने पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर आज सांगितले. तथापि अपिलार्थीस ही माहिती पाठविल्याप्रित्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयाचे आवक जावक रजिस्टर आयोगाने त्यांच्या नोटीसीमध्ये सूचित करुनही, आयोगास सादर केले नाही याची प्रकर्षाने नोंद घेण्यात येत आहे. अपिलार्थीस हे पत्र प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच पोस्टाने माहिती पाठविली होती किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेश निर्माण होत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली माहिती विहित मुदतीत न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१०-२००६ रोजी याविषयासंदर्भात प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३१-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८-११-२००६ रोजी असल्याचे कळविले. तथापि हे पत्र जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने दिनांक ०७-११-२००७ रोजी पोस्टात पाठविले व सदर पत्र अपिलार्थीस प्रत्यक्षात दिनांक ०९-११-२००६ रोजी प्राप्त झाल्याने अपिलार्थीस या सुनावणीस उपस्थित राहता आले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. या दिवशी या प्रकरणाची सुनावणी होऊ शकली नाही असे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे उपस्थित प्रतिनिधीने आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये दिनांक २७-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापपर्यत त्यांना प्राप्त झाली नाही. त्याचबरोबर त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने सुनावणीचे निमंत्रण दिनांक ३१-१०-२००६ चे पत्र दिनांक ०७-११-२००६ रोजी पोस्टाने टाकले. सुनावणी दिनांक ०८-११-२००६ रोजी होती व सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०९-११-२००६ रोजी मिळाल्याने त्यांना सुनावणीस उपस्थित राहता आले नाही. त्यांनी यापुढे असाही युक्तिवाद केला की, त्यांना पाठविलेल्या पत्राच्या पाकिटावर संबंधितांनी त्यांच्या कार्यालयाचा कोणत्याही प्रकारे उल्लेख केलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती दिनांक २०-१०-२००६ रोजी साध्या पोस्टाने पाठविली आहे. त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती पाठविल्याबद्दल आयोगाकडे शपथपत्र सादर

केले आहे. यावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे असे अनुमान काढण्यास हरकत नाही. आजही ते अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाले नाही तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेल्या अपील अर्जाची प्रत पाहता सदर अपील अर्ज जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागामध्ये दिनांक १९-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीचा मूळ अर्ज व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कडे केलेल्या प्रथम अर्जामध्ये कोणत्याही विशिष्ट कालावधीचा उल्लेख केलेला नाही त्यामुळे अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे त्याचा बोध होत नाही. अपिलार्थीने विहित नमुन्यात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला आहे तथापि माहितीशी संबंधीत कालावधी या रकान्यासमोर त्यांनी " तीस " दिवस असा उल्लेख केला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप स्पष्ट नसल्याने जन माहिती अधिकारी यांना ही माहिती देणे शक्य होणार नाही हे उघड आहे. तथापि तरीही त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-१०-२००६ रोजी अपिलार्थीच्या माहितीचा मुद्दा क्रमांक १ व २ वर त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही निश्चित स्वरुपाची नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगवशात या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी आयोगा-समोर त्यांच्या कार्यालयाचे आवक जावक रजिस्टर त्यांना सूचना प्राप्त होऊनही सादर केलेले नाही यावरुन त्यांच्या अपिलार्थीस माहिती देण्यापोटीच्या केलेल्या कृतीबद्दल आयोगास साशंकता निर्माण होत आहे. त्याचबरोबर नांदेड जिल्हापरिषदेच्या सामान्य प्रशासन विभागा-मध्ये अपिलार्थीने अपील अर्ज दाखल करुनही तो जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे न

पोहोचणे, विशेषतः माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे तो करुनही, ही बाब पाहता जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने या प्रकरणी घेतलेल्या भूमिकेबद्दल आयोगास संदेह निर्माण होत आहे. मुळात माहिती अधिकार अधिनियमाची निर्मिती सार्वजनिक प्राधिकरणांच्या कारभारात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने केलेली आहे. तथापि या प्रकरणी नांदेड जिल्हापरिषदेच्या जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी या अधिनियमाच्या मूळ हेतुलाच छेद देणारी कृती आपल्या कार्यशैलीतून दर्शविली आहे. येथून पुढे त्यांनी आपला कारभार जास्तीत जास्त पारदर्शकपणे करावा असे यानिमित्ताने यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीचा अपील अर्ज गहाळ होण्याकरिता जे कर्मचारी जबाबदार असतील त्यांच्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी तात्काळ महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन याबाबत आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत सादर करावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. अपिलार्थीचा दिनांक १९-१०-२००६ रोजीचा अपील अर्ज नांदेड जिल्हा परिषदेकडून गहाळ होण्याकरिता जे कर्मचारी जबाबदारी आहेत त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनिष सुर्यकांतराव कुलकर्णी, व्दारा एल. बी. देशमुख यांचा वाडा, नरसिंह गल्ली, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५४२

निकाल दिनांक ०५-१०-२००७

श्री. सुनिल श्रीराम शेड्ुते, : अपिलार्थी

व्दारा – पुजा एम्पोरियम, बसस्टँड,

बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),
जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुनिल श्रीराम शेडुते (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) श्री. धनराज वैजनाथ निला (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बीड जिल्हा परिषदेतील सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापना विषयक एकूण १६ मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने सर्व माहिती वेगवेगळ्या कर्मचा-यांसंदर्भात प्रश्नार्थक स्वरुपात विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देण्यात

आला.  जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाठविल्या गेलेल्या या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती / खुलासा दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या खुलाशाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००६ रोजी प्रथम अपील सादर केले.  या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०९-२००६ रोजी घेऊन या संदर्भातील त्यांचे आदेश त्यांचेकडील दिनांक ०७-०९-२००६ रोजी पारीत केले आहेत.  या आदेशामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस पुरविणे जन माहिती अधिका-यावर बंधनकारक नाही असे कारण दर्शवून अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले त्यांचे अपिलावरील आदेश चुकिचे असून त्यांच्या कर्तव्यपालनात त्यांनी कसूर केल्याने त्यांच्यावर प्रचलीत नियमा-प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करावी अशी आयोगास विनंती केली आहे व त्याच बरोबर माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९, १९ (७) नुसार दिवाणी कोर्टा-प्रमाणे अधिकार कलम १८ (३) ए ते एफ अन्वये शिक्षा प्रस्तावित करुन कार्यालयीन शिस्तीचा भंग केल्याबद्दल दंड ठोठावण्यात यावा अशी विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकिची माहिती मिळाली आहे.  त्याचबरोबर

त्यांनी आयोगाकडून त्यांच्या पुर्ननियुक्ती संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना आदेशित करण्याची विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे आयोगाकडे लेखी युक्तिवाद सादर करण्यात आला. त्यामध्ये -- अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०१-०७-२००६ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अर्जदाराने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असूनही त्यांच्या अर्जाचा जन माहिती अधिकारी यांनी सहानुभुतीपूर्वक विचार करुन अपिलार्थीस त्यांना योग्य वाटेल अशी माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या लेखी युक्तिवादामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, अपिलार्थी हे बीड जिल्हा परिषदे अंतर्गत कनिष्ठ सहाय्यक या पदावर कार्यरत असतांना, अनाधिकृतपणे गैरहजर राहणे, वरिष्ठांच्या आदेशांचे पालन न करणे, अनावश्यक पत्रव्यवहार करणे, अपहार, वरिष्ठांना दुरोत्तर करणे इत्यादी कारणांवरुन विभागीय चौकशी करुन त्यांना जिल्हा परिषद सेवेतून कमी करण्यात आले आहे. जिल्हा परिषद स्तरावर केलेली कारवाई शासन स्तरावर देखील मान्य झाल्याने व्यथित होऊन कोणत्याही प्रकारे जनहित साध्य न होताना देखिल अपिलार्थी वैयक्तीक स्वरुपाची माहिती वारंवार मागवून या अधिनियमाचा गैरवापर करत आहेत त्यामुळे प्रशासनाचा वेळ व श्रम अनाठाई खर्च होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे माहितीच्या अधिकारातंर्गत सन २००५-२००६ मध्ये १४ अर्ज केले (एकूण प्राप्त अर्ज ३७) व सन २००६-२००७ मध्ये ०७ अर्ज (एकूण प्राप्त अर्ज ७८) सादर केले असून त्यांची वर्षनिहाय सरासरी अनुक्रमे ३८ टक्के व ०९ टक्के एवढी आहे, -- असे म्हटले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता त्यांनी एकूण १६ मुद्दयावर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५

मधील कलम २ (च) मध्ये माहिती या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट करण्यात आली आहे ती खालील प्रमाणे आहे.

<u>कलम २ (च)</u>

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. "

अपिलार्थीने मागितलेली माहिती यापैकी कोणत्याही प्रकारात मोडत नसल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे. अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे जन माहिती अधिका-याने देणे ही त्यांची अपेक्षा चुकीची असून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे त्यांना जन माहिती अधिका-याकडे संबंधीत अभिलेख्याची पाहणी करुन स्वतःच शोधून काढावी लागतील. याकरिता त्यांनी या अपिलाच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी संदर्भिय नस्तीची पाहणी करण्याची विनंती संबंधीत जन माहिती अधिका-यास करुन त्यांना संबंधीत प्रकरणाची नस्ती पाहण्यासाठी उपलब्ध करुन घेणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शक्य आहे. त्याप्रमाणे त्यांनी संबंधीत नस्ती पाहण्याची मागणी वेगळ्या अर्जाव्दारे जन माहिती अधिका-यास करावी व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या विनंतीची प्राथम्याने दखल घेऊन त्यांना पाहण्यासाठी अपेक्षित असलेली नस्ती त्यांचा विनंती अर्ज प्राप्त झाल्यानंतर जास्तीत जास्त १० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी एवढेच या प्रकरणी सूचित करणे आयोगास

शक्य आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी या सुचनांची नोंद घेऊन अपिलार्थीस सहकार्य करावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय योग्य असून त्यामध्ये फेरफार करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे विनंती केल्याप्रमाणे कलम १९ (७), व कलम १८ (३) ए ते एफ या कलमांच्या तरतुदी अपिलाच्या सुनावणीतील कोणत्याही मुद्दयाशी संबंधीत नाहीत त्यामुळे अपिलार्थीची ही विनंती अमान्य करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल श्रीराम शेडुते, व्दारा – पुजा एम्पोरियम, बसस्टँड, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५४३

दिनांक ०५-१०-२००७

श्री. हनमंत काशीराव देशमुख, : अपिलार्थी
मु. पो. देशमुख गल्ली, भोकर,
तालुका भोकर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी, तालुका कृषि
अधिकारी कार्यालय, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

सध्या :  जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हनमंत काशीराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. कुलकर्णी विक्रम विश्वंभरराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. बालाजी बाबुराव दावलबाजे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ३०-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रा-तील कामासाठी धान्य योजने अंतर्गत झालेल्या कामाबद्दल खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. “ कारेगाव, हारेगाव (अर्दन स्ट्रक्चर) कामावरील मस्टर रजिस्टरच्या सत्यप्रती,

२. सन २००६ मध्ये चालू असलेल्या कामावरील मजुराची गावासहीत यादी.”

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी एकूण ५२० रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याविषयी सूचित केले. सदर पत्र त्यांनी साध्या

पोस्टाने अपिलार्थीस पाठविल्याचे आज सुनावणीमध्ये सांगितले. तथापि हे पत्र अपिलार्थीस मिळाले नसल्याचे अपिलार्थी सुनावणीमध्ये सांगत आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांना सुनावणी न घेण्याचे कारण विचारले असता त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नसल्याचे सांगितले. अपिलार्थीने यावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला अपील अर्ज त्यांना पोस्टाने पाठविल्याचे सांगून त्याप्रित्यर्थ संबंधीत पोस्ट ऑफिसची अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगची प्राप्त स्विकृतीची प्रत दाखविली. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले होते असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये दिनांक ०६-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे व या अपिलामध्ये आपली मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली आहे.

राज्य माहिती आयोगाकडे अपिलार्थीने व्दितीय अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-१०-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयातील दुत श्री. जी. जे. गायकवाड यांच्यामार्फत अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक ३०-०५-२००६ रोजी प्रथम अर्ज केला होता. या अर्जातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २०-१०-२००६ रोजी विनामूल्य प्राप्त झाली असल्याने त्यांचे याबाबत आता काही म्हणणे नसून या माहितीने त्यांचे समाधान झाले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, माहिती अधिकार अधिनियमातील प्रकरणे ते नेहमी तत्परतेने हाताळत असतात व अर्जदारास माहिती देण्याकरिता ते स्वखर्चाने पोस्टाची तिकीटे विकत घेऊन अर्जदारास माहिती देत असतात. या प्रकरणी त्यांनी स्वखर्चाने पोस्टातून तिकिटे विकत घेऊन, अपिलार्थीस रुपये ५२० इतके शुल्क भरण्याविषयीचे पत्र विहित मुदतीत पाठविले होते तथापि तदनंतर अपिलार्थी कडून सदर शुल्काचा भरणा न झाल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने त्यांच्या कार्यालयातील दुत श्री. जी. जे. गायकवाड यांच्यामामार्फत व्यक्तिशः अपिलार्थीस माहिती पोहोचती केली आहे. अपिलार्थीने माहिती पोस्टाने मागविली असतांना अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः पोहोचविण्याचे प्रयोजन काय होते असे जन माहिती अधिका-यास विचारले असता माहिती अधिकार कायद्यातील तरतुदीच्या भीती व दडपणामुळे अपिलार्थीस ही माहिती त्यांनी विनामूल्य पोहोचती केली आहे असे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम पाहिला असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीने विचारलेली माहिती पुरविण्यापोटी लागणारे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याविषयी पत्र लिहिले आहे. सदर पत्र त्यांनी खरोखरच पोस्टाने पाठविले आहे किंवा कसे हे सिध्द करण्यासाठी आज रोजी कोणताही पुरावा उपलब्ध नाही. सदर पत्र अपिलार्थीस मिळाले नाही. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयातील खास दुतामार्फत दिनांक २०-१०-२००६ रोजी अपिलार्थीस

त्यांनी मागितलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे व अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य प्राप्त देखील होऊन त्या माहितीने त्यांचे समाधान झाले आहे. अपिलार्थीस आता माहिती प्राप्त झाली आहे हे पाहता अपिलार्थीचे व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

प्रसंगवशात येथे या प्रकरणी असे दिसून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी जरी अपिलार्थीस माहिती दिली असली तरी त्यांनी आपल्या कार्यालय अभिलेख्यात आवक जावक रजिस्टरचा पोस्टाच्या तिकिटांचा हिशोब व्यवस्थितरित्या ठेवलेला नाही. त्यांनी, माहिती अधिकाराखालील पत्रव्यवहार ते स्वखर्चाने करतात हे केलेले विधान थोडे धारिष्ट्याचे वाटते. येथून पुढे माहिती अधिकार संदर्भातील पत्रव्यवहार करण्यामध्ये त्यांनी आवश्यक ती सतर्कता बाळगावी अशी त्यांना आयोगातर्फे सूचना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हनमंत काशीराव देशमुख, मु. पो. देशमुख गल्ली, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५४४

दिनांक ०५-१०-२००७

श्री. हनमंत काशीराव देशमुख, : अपिलार्थी
मु. पो. देशमुख गल्ली, भोकर,
तालुका भोकर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी, तालुका कृषि
अधिकारी कार्यालय, हदगाव,
तालुका हदगाव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, हदगाव,
तालुका हदगाव, जिल्हा नांदेड

सध्या : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हनमंत काशीराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. वसंत शंकरराव देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. गोविंद किशनराव कौलवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रा-तील कामासाठी धान्य या योजने अंतर्गत असलेल्या कामाबाबत दिनांक ०१-१०-२००५ ते ३१-०१-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

४. " नाव्हा (एन. बी. – नाला बंडिंग) पिंपळगाव (एन. बी.) २ पिंपळगाव (राजवाडी) (एन. बी.)

५. घोगरी (तळ्याचीवाडी) अर्बन स्ट्रक्चर, आर. टी.

वरील कामाचे एम. बी. व मजुरी मस्टर रजिस्टरच्या सत्यप्रती देणे, पूर्ण झालेल्या कामाची यादी व ती कामे शासनाच्या नियमाप्रमाणे पूर्ण झालीत काय, सर्व्हे नंबर, प्रशासकीय मान्यता ०१-१०-२००५ ते ३१-०१-२००६ कालावधी."

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीकडून सदर माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील पत्र क्रमांक ८२९, दिनांक २७-०६-२००६ अन्वये त्यांच्या नियंत्रणाखालील मंडळ कृषि अधिकारी हदगाव, तामसा, निवघा यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याविषयी कळविले. तथापि यांच्या या पत्राचा अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने कोणताही उपयोग झाला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २२-०८-२००६ रोजी प्राप्त झाला. या अपील अर्जात विनंती केल्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाकडील पत्र क्रमांक १०७२, दिनांक ०२-०९-२००६ अन्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक ०८-०९-२००६ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे कळविले, तथापि या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत. तसेच सुनावणीची तारीख पुढे ढकलण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांना कोणतीही विनंती न केल्याने जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी कोणताही निर्णय घेणे शक्य झाले नाही असे त्यांनी आयोगासमोर आज रोजी सादर केलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी उपस्थित राहण्याबद्दल लिहिलेले दिनांक ०२-०९-२००६ रोजीचे पत्र अपिलार्थीस दिनांक ०९-०९-२००६ रोजी म्हणजेच अपिलाची सुनावणीची तारीख ओलांडून गेल्यानंतर प्राप्त झाले आहे त्यामुळे अपिलार्थीस स्वाभाविकच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस हजर राहणे शक्य झाले नाही.

अपिलार्थीस सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे पत्र उशिरा प्राप्त झाल्याने अपिलार्थीने दिनांक ०९-०९-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या अपिलाच्या सुनावणी संदर्भात दुसरी तारीख देण्यासाठी त्यांच्याकडे दिनांक ०९-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली हे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याचे दिसून येते व त्याचप्रमाणे त्यांनी आयोगास पुरावा सादर केला आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०९-०९-२००६ रोजीच्या पत्रास जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी खरोखरच सुनावणी घ्यावयाची होती किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात साशंकता निर्माण होत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिका-याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये दिनांक ०६-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी दिनांक २१-०६-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियमाखाली अर्ज करुनही त्यांना आजपावेतो त्यांनी मागितलेली कोणतीही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, कामाच्या व्यापामुळे त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देणे जमले नाही. पूर आणि अतिवृष्टी अनुदानाचे वाटप व कापसाचे पैसे शेतक-यांना वाटणे इत्यादी कामे त्यांच्यावर त्यांच्या

नियमित कामांखेरीज सोपविली गेली होती. या कामाच्या व्यापातून त्यांना वेळ मिळाला नसल्याने अपिलार्थीस ते ही माहिती विहित मुदतीत देऊ शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद मांडला की, माहिती अधिकार कायद्या-तील तरतुदीविषयी ते पूर्णतः अनाभिज्ञ असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत माहिती पुरविणे शक्य झाले नाही. त्यांनी आता माहिती तयार केली असून ती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची तयारी दर्शविली आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता कृषि विभागातील अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियमाशी काहीही कर्तव्य नसल्याचे त्यांच्या कृतीव्दारे ते सिध्द करत आहेत. अपिलार्थीने मागितलेली माहिती फक्त मस्टरच्या झेरॉक्स प्रती इतकीच मर्यादित असतांना व अपिलार्थीने मागितलेली माहिती पुरविण्यासाठी विहित कालावधी ओलांडून १५ महिने नंतर देखील त्यांनी अपिलार्थीस माहिती न पुरविणे हे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाचे द्योतक आहे असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. त्यांनी आपल्या कार्यशैलीतून केवळ कर्तव्य परायणतेचा अभावच स्पष्ट केला नाही तर अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरवून त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रती त्यांच्या मनात असलेला अनादर या प्रकरणी पूर्णपणे दर्शविला आहे. जन माहिती अधिकारी हे कितीही कामात व्यस्त असले तरी माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर त्यांनी या अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे ३० दिवसात या अर्जाचा निपटारा करणे अपेक्षित आहे. या कायद्यामध्ये जन माहिती अधिकारी इतर कामात व्यस्त असल्यास विहित मुदतीत माहिती देण्यास कोणत्याही प्रकारची सवलत दिलेली नाही हे पाहता व तसेच अपिलार्थीने माहितीसाठी केलेला अर्ज माहितीचे स्वरुप व व्याप्ती व त्यांना प्रत्यक्ष माहिती मिळण्याकरिता ही माहिती तयार ठेवल्याचा दिनांक यामधील व्यतीत झालेला प्रदीर्घ कालावधी (१५ महिने) पाहता जन माहिती अधिकारी यांना

या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सूट अथवा सवलत देणे म्हणजे माहिती अधिकार अधिनियमाचे पावित्र्य नष्ट केल्यासारखे होईल असे आयोगास वाटते. या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जी माहिती द्यावयाची होती ती एकूण ३ कृषि मंडळ अधिका-यांकडून प्रथम प्राप्त करुन घ्यावयाची होती. त्यांनी जन माहिती अधिका-यांना ही माहिती विहित मुदतीत न दिल्याने अंतीमतः जन माहिती अधिकारी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) प्रमाणे जन माहिती अधिका-यास, माहिती पुरविण्यासाठी जे इतर कर्मचारी जबाबदार असतात त्यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. तेव्हा या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी जन माहिती अधिकारी व ही माहिती त्यांना देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांच्या हाताखालील व इतर कर्मचारी या सर्वांना मिळून प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

या रकमेचा भरणा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षा खाली करावा.

त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे इतर सर्व अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे निश्चित केलेल्या विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० रुपयाची शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षा भरावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर सात दिवसाचे आत सादर करावा.

४. आयुक्त (कृषि) पुणे यांनी वरील मुद्दा क्रमांक ३ च्या आदेशाचे विहित मुदतीत अनुपालन झाले आहे याची खात्री करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हनमंत काशीराव देशमुख, मु. पो. देशमुख गल्ली, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हदगाव, तालुका हदगाव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हदगाव, तालुका हदगाव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५४५

दिनांक ०५-१०-२००७

श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी

शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,

जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार, पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी, परभणी,

जिल्हा परभणी

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मधुकर हिराजी मुळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सप्टेंबर २००५ ते फेब्रुवारी २००६ या कालावधी तील केंद्रीय अन्नपूर्णा योजने अंतर्गत झालेल्या धान्य वाटपाबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

४. "सदरील कालावधीत आपली मागणी व उपलब्ध झालेला कोठा किती ? (पूर्णा तालुक्याचा)

५. सदरील कालावधीत दुकानदारांना वाटप केलेला कोठा किती ? कोणत्या दुकानदारांस किती कोठा दिला त्याबाबत दुकानदाराचे नांव, गाव, वाटप कोठ्यापैकी दुकानाने वाटून शिल्लक राहिलेला कोठा किती ?

६. कोठा वाटप केला नसल्यास वाटप न करण्याचे कारण काय ?"

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने एकूण मागितलेली सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. तथापि पहिल्या दोन मुद्यावरील माहिती अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याने सहज देता येणे शक्य होते. वरील माहितीतील मुद्दा क्रमांक ३ यामध्ये वाटप न करण्याचे कारण अपिलार्थीने माहिती अधिका-यास विचारले आहे ही माहिती जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मागविणारी असल्याने व ती माहिती अधिका-याने

अपिलार्थीस देणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपेक्षित नसल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अपेक्षित नाही.

अपिलार्थीच्या या माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कडून कोणताच प्रतिसाद प्राप्त न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे कळण्यास काहीही मार्ग नाही तथापि अपिलार्थी यांच्या मते आजतागायत कोणत्याही प्रकारची सुनावणी झालेली नाही किंवा त्यांनी मागितलेली कोणतीही माहिती त्यांना मिळालेली नाही. त्यांनी याप्रमाणे आयोगास शपथपत्र सादर केलेले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २५-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलाचे कारण म्हणून त्यांनी त्यांना अद्यापपर्यत माहिती प्राप्त न झाल्याने व त्यांचे जन अपिलीय अधिका-याकडून अपील निकाली निघाले नाही असे दिले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही वीनापरवानगी गैरहजर आहेत तर अपिलार्थी हे हजर आहेत.

अपिलार्थी यांच्यातर्फे शपथपत्राव्दारे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यतही प्राप्त झाली नाही तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००६

रोजी दाखल केलेल्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची आज पर्यत सुनावणी घेतलेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी अर्ज दाखल केल्याप्रित्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा शिक्का व संबंधीत लिपिकाची सही असलेली झेरॉक्स प्रत सादर केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे त्यांनी त्यांचे प्रथम अपील रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले असून सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १४-०६-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे, अपिलार्थीने सादर केलेल्या पोस्टाच्या स्विकृतीपत्रावरुन दिसून येते. पोस्टाच्या संबंधीत स्विकृतीपत्राची प्रत त्यांनी आयोगाकडे सादर केली आहे. अपिलार्थीने दिनांक १३-०४-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२-०५-२००६ रोजी मिळणे आवश्यक होते तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याचे किंवा या माहितीसंदर्भात आवश्यक ते शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याची तसदी देखील घेतली नाही हे या प्रकरणी प्रामुख्याने नमूद करावे लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने अपील दाखल केले जाऊनही त्याची कोणत्याही प्रकारे दखल न घेणे हे त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाई व निष्काळजीपणा स्पष्ट करते. त्यांच्या या कार्यशैलीची यथायोग्य नोंद महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे त्यामुळे त्यांच्यावर सचिव (महसूल) यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांना असेही आदेशीत करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन माहिती

अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचा भंग केल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) अन्वये प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा स्वंयस्पष्ट खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात सादर करावा व त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. त्यांच्यावर लादण्यात येणा-या शास्तीचा यथायोग्य निर्णय त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर घेण्यात येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर, ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८७

दिनांक ०८-१०-२००७

श्री. वामन रंगनाथ मोरे, संपादक, : अपिलार्थी

बी-१५४, विवेकनगर, वसमत रोड,

परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा उप निबंधक सहकारी संस्था, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक,

सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

सध्या : जन माहिती अधिकारी : उप निबंधक नागरी बॅंक

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. वामन रंगनाथ मोरे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक नागरी बॅंक श्री. वाय. पी. गिरी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांचे प्रतिनिधी उप निबंधक नागरी बॅंक हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०६-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि परभणी पिपल्स को-ऑपरेटिव्ह बॅंक लिमिटेड यांच्या संदर्भात एकूण १५ मुद्दयावर माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये -- सदर बॅक सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत येते किंवा कसे, महाराष्ट्र राज्य विधी मंडळ कायद्याच्या अधिकार कक्षेत किंवा नियंत्रणाखाली येते किंवा कसे, ही बॅक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या नियमानुसार नोंदणीकृत केलेली सहकारी संस्था आहे किंवा कसे, महाराष्ट्र शासन किंवा केंद्र शासन एखाद्या सहकारी संस्थेस भरीव वित्तीय सहाय्य देत नसेल तर त्या संस्थेची नोंदणी, अधिकार कसा नसतांना त्या संस्थेचे कायद्याने नियंत्रण नसतांना करण्याचा अधिकार सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था कसा व काय म्हणून प्राप्त होतो, मला आपणाकडून माहिती मागण्याचा अधिकार आहे किंवा नाही, मला आपणा-कडून दि परभणी पिपल्स को-ऑपरेटिव्ह लिमिटेडच्या संदर्भातील माहिती प्राप्त करुन घेण्याचा अधिकार आहे किंवा कसे, या बॅकेची अधिकृतपणे केव्हा नोंदणी झाली आहे, नोंदणी क्रमांक काय आहे, या बॅकेचे कार्यक्षेत्र २ जिल्ह्यासाठी आहे तेव्हा या बॅकेंवर कोणत्या सहकारी अधिकारी यांचे प्रत्यक्ष प्रशासकीय नियंत्रण आहे, दि परभणी पिपल्स को-ऑपरेटिव्ह बॅके मार्फत ज्ञानोपासक शिक्षण मंडळ कर्मचा-यांना, कोणत्या वर्षी, एकूण किती रक्कमेचे पगार पत्रकावर कर्जवाटप केले आहे. थकबाकी कर्जदाराकडून पगारातून नियमीत कपात केलेली आहे काय, हे थकीत कर्ज वसुलीसाठी काही कारवाई केली आहे काय, नोटीसा किंवा १०१ ची कार्यवाही झालेली आहे काय, थकबाकी वसुलीसाठी बॅकेमार्फत वसुलीची कारवाई का झालेली नाही, बॅकेने वसुली न करण्यामागची काय कारणे आहेत, कोण जबाबदार आहे, विभागीय सह निबंधक सहकारी संस्था औरंगाबाद यांनी नियंत्रक अधिकारी म्हणून ज्ञानोपासक शिक्षण मंडळ कर्मचा-यांकडील, थकीत रक्कम वसूल करण्यासाठी काय प्रयत्न केले आहेत व ३१ मे २००६ पर्यत किती मुद्दल व किती व्याज वसुलीस पात्र आहे -- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती एप्रिल २००४ ते ३१ मे २००६ पर्यतच्या कालावधीतील विचारली असून ती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९ जून २००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. त्यामध्ये सहकार आयुक्त यांचे दिनांक ०८-०२-२००६ च्या परिपत्रकानुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बॅकांना लागू होत नसल्याने अपिलार्थीने पाठविलेल्या अर्जावर कोणतीही कारवाई करता येणे शक्य नसल्याचे अपिलार्थीस कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे याच विषयावर दिनांक २७-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, सदर माहिती अधिकार कायदा २००५ हा नागरी सहकारी बॅकांना लागू होत नसल्याने त्यांच्या अपिलावर कोणतीही कारवाई करता येत नाही असे कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. हे अपील करण्याचे कारण म्हणजे त्यांना दि परभणी पिपल्स को-ऑपरेटिव्ह बॅक परभणी यांच्याकडून माहिती मिळाली नाही व सहकार आयुक्त यांच्या दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या परिपत्रकाच्या विरोधात हे अपील केले आहे -- असे कारण दिले आहे.

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी ज्ञानोपासक शिक्षण मंडळ परभणी या संस्थेच्या किती कर्मचा-यांना किती कर्ज दिली आहेत व त्यांच्या सद्यस्थितीबाबतच्या माहितीची मागणी केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे त्यांनी आपला लेखी युक्तिवाद सादर केला असून त्यामध्ये प्रामुख्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बॅकांना लागू होत नसल्याचे व त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जावर त्यांना कोणतीही कारवाई करता येत नसल्याचे नमूद केले आहे. त्यांनी दिलेल्या लेखी निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, अपिलार्थी यांची माहितीची मागणी प्रामुख्याने दि परभणी पिपल्स बॅक लिमिटेड परभणी या बॅकेने ज्ञानोपासक शिक्षण मंडळ परभणीच्या कर्मचा-यांना दिलेल्या कर्जासंबंधी, कर्जाच्या वसुलीसंबंधी आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही ती बॅकेच्या अभिलेख्यातील माहिती आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रत्येक कर्मचा-याच्या खाजगी व्यवहारासंदर्भातील माहिती असून सदर कर्मचा-याच्या कर्ज खात्यासंदर्भातील माहिती देता येणार नाही कारण अशा माहितीचा दुरोपयोग होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

वरील युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपीलार्थीने विचारलेली माहिती उपलब्ध नसल्याने त्यांना ती माहिती अपिलार्थीस देता येणार नाही असा त्यांचा युक्तिवाद बरोबर आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही दि परभणी पिपल्स नागरी सहकारी बॅकेच्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे. अपिलार्थीने ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत बॅकेकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ व्दारा अलाहिदा अर्ज करावा म्हणजे त्यावर सदर बॅकेचे जन माहिती अधिकारी योग्य तो निर्णय देऊ शकतील असे आयोगाचे मत आहे.

दुसरा मुद्दा म्हणजे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेली माहिती त्यांच्याशी संबंधीत नसून जी माहिती विचारली आहे ती सर्वसाधारणपणे प्रश्नार्थक स्वरुपात विचारली आहे. ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील “ माहिती ” च्या कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येत बसत नाही. त्याचबरोबर कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही

व्यक्तीने घेतलेले कर्ज याची परतफेड इत्यादी माहिती बँकींग रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे त्रयस्त व्यक्तीला उपलब्ध करुन देता येत नाही. ज्ञानोपासक शिक्षण मंडळाच्या कर्मचा-यांना बँके-कडून किती मंजूर झाले त्यापैकी किती कर्जाची परतफेड करण्यात आली इत्यादी माहिती निःसंशयपणे खाजगी स्वरुपाची आहे अशी माहिती अपिलार्थीस मिळाल्यास कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नाही असे आयोगाचे मत आहे व ही माहिती दिल्याने संबंधीत कर्मचा-यांच्या खाजगीबाबतीत अगंतूक हस्तक्षेप होईल व परिणामी माहिती अधिकार अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) त्र चा भंग होईल असे आयोगास वाटत असल्याने अपिलार्थीस ही माहिती न देण्याच्या जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयात बदल करणे आयोगास, जरी त्यांनी दिलेली कारणे वेगळी असली तरी, इष्ट वाटत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी या नागरी सहकारी बॅकांना लागू होतात किंवा कसे याबाबत या निर्णयात काहीही भाष्य नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वामन रंगनाथ मोरे, संपादक, बी-१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, (उप निबंधक नागरी बॅंक), पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

२.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५५१

निकाल दिनांक ०९-१०-२००७

श्री. प्रदिप दादाराव वडतकर, : अपिलार्थी

सी - १४, विशाल अपार्टमेंट, ज्योतीनगर,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव,

विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती

क्रमांक (१), औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभागीय अपर आयुक्त (महसूल),

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

सध्या : जन अपिलीय अधिकारी : विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक (१), औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रदिप दादाराव वडतकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक (१) श्री. रामदास नारायण वैद्य (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय अपर आयुक्त (महसूल) श्रीमती रिचा बागला (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व विभागीय समाजकल्याण अधिकारी श्री. दत्तात्रेय प्रल्हादराव वाकोडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २०-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात जानेवारी २००१ ते जून २००७ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

१. जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र शासन यांनी आपणाला दिलेले निर्देश, नियम व अधिनियम यांची तपशीलवार माहितीची प्रत,

२. एखाद्या व्यक्तीच्या रक्त नात्यात कोणत्याही व्यक्तीकडे वैधता प्रमाणपत्र प्रत नसेल व १९६० पुर्वीचा पुरावाही नसेल तर अशा वेळेस आपण त्या व्यक्तीला कोणत्या निकसाच्या आधारे वैध प्रमाणपत्र द्याल याचा लेखी खुलासा द्यावा.

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास दिनांक २०-०७-२००६ रोजी प्राप्त झाला होता.

अपिलार्थीने ही माहिती शिघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. तथापि हे पत्र अपिलार्थीस त्यावेळी प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले. या पत्राची व्दितीय प्रत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीने हे अपील विभागीय अपर आयुक्त (महसूल) तथा जन अपिलीय अधिकारी यांच्या कडे केले होते. तथापि जात पडताळणी संदर्भात अपर विभागीय आयुक्त (महसूल) हे

अपिलीय अधिकारी नसल्यामुळे व विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद हे प्रत्यक्षतः या प्रकरणी अपिलीय अधिकारी असल्यामुळे विभागीय अपर आयुक्त यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक ०५-०९-२००६ अन्वये सदर अपील पुढील कार्यवाहीस्तव विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांच्याकडे पाठविले.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली असल्याचे दिसून येत नाही. सदर अपिलाची सुनावणी त्यांनी का घेतली नाही असे विचारले असता त्यांनी सदर अपील त्यांचे कार्यालयातील कंत्राट पध्दतीवर नेमणूक केलेल्या विधी अधिका-यामुळे त्यांचेपर्यंत येऊ शकले नाही असा खुलासा केला. जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला खुलासा शासनाच्या सामाजिक न्याय या महत्वाच्या खात्यामधील एका महत्वाच्या पदावरील अधिका-याच्या मनातील माहिती अधिकार अधिनियमाप्रती त्यांच्या मनात असलेला अनादर व त्यांच्यातील बेपर्वाई वृत्ती स्पष्ट करते. सचिव (सामाजिक न्याय) यांनी अशा प्रकारच्या प्रवृत्तींचा बिमोड करण्यासाठी त्वरीत पावले उचलावीत व त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना “ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ” मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसंदर्भात वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजीत करावीत अशा सूचना त्यांना यापुर्वीच्या ब-याच अपिलामध्ये देऊनही अद्यापपर्यत त्यांच्या खात्यातील कर्मचा-यांच्या कार्यपध्दतीत कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही असे या ठिकाणी खेदाने नमूद करावेसे वाटते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचा दिनांक २०-०७-२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २४-०७-२००६ रोजी नेऊन दिला व त्याची स्विकृती पोच संबंधीताकडून घेतली आहे. अपिलार्थीने दिनांक २४-०७-२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज दिल्यानंतर त्यासंबंधीची माहिती त्यांना दिनांक २३-०८-२००६ रोजी अगर त्यापुर्वी मिळणे अपेक्षित होते, तथापि त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. त्याच बरोबर सदर माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिका-याकडे जे अपील केले त्या अपिलावरही संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आयोगाचे सुनावणीचे पत्र त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०५-१०-२००७ रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाली. याचाच अर्थ अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये, माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क असूनही त्यांना आवश्यक ती माहिती मिळविण्यापासून जन माहिती अधिका-याकडून वंचित ठेवले गेले त्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्तीची कारवाई करावी. याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती अपूर्ण असल्याचेही त्यांचे म्हणणे त्यांनी आयोगासमोर मांडले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा खुलासा करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०९-०९-२००६ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली आहे. अपिलार्थीस त्यांनी ही माहिती पोस्टाने पाठविल्याच्या पुराव्याप्रित्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील आवक जावक नोंदवहीची झेराक्स प्रत आयोगासमोर सादर केली असता त्याच्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पोस्टाने दिनांक ०९-०९-२००६ रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येते. तथापि या कालावधीतील स्टॅम्प अकांऊट त्यांनी आयोगास सादर केलेले दिसून येत नाही त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस खरोखरच दिनांक ०९-०९-२००७ रोजी

माहिती पुरविली किंवा कसे याबद्दल शंका येण्यास भरपूर वाव आहे असे आयोगाचे मत आहे.

वरील घटनाक्रम व आयोगाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने एकूण २ मुद्दयावर माहिती विचारली होती. त्यापैकी एका मुद्दयावर विचारलेली माहिती सरळ व स्पष्ट स्वरुपात असून मुद्दा क्रमांक २ वर विचारलेली माहिती ही खुलासेवजा स्वरुपातील विचारली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०९-२००६ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर जाती प्रमाणपत्र देणे व जातीचे प्रमाणपत्राची पडताळणी करणे याकरिता महाराष्ट्र शासनाने सन २००१ मध्ये कायदा केला असून या कायद्याअंतर्गत जात पडताळणी समितीबाबत नियम करण्याचे काम अद्यापही शासनस्तरावर चालू असून सदर नियम अद्यापही शासनाने प्रसिध्द केलेले नाहीत. शासनाकडून अद्यापही या संबंधातील नियमावली प्रसिध्द झाली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. जर नियमावली नसेल तर या समितीचे कामकाज कसे चालते असे विचारले असता सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी काढलेले परिपत्रके, आदेश इत्यादींच्या मर्जीने सर्व कामे चालतात असे त्यांनी त्यांच्या खुलाशामध्ये स्पष्ट केले.

अपिलार्थीने विचारलेल्या वैध प्रमाणपत्र निकषाबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस याच पत्रामध्ये खुलासा केल्याचे दिसून येते. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य दिली आहे. अपिलार्थीने या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे ती संबंधीत न्यायालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध होऊ शकेल असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. सदर प्रत देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या पत्रामध्ये दिली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

वरील विवेचन पाहता अपिलार्थीस अपेक्षित असलेली सर्व माहिती आता मिळाली आहे असे दिसते. तथापि अपिलार्थीस ही माहिती मिळण्यापोटी जन माहिती अधिकारी यांनी १७ दिवसांचा असमर्थनीय विलंब लावला असल्याचे दिसून येते. सदर विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांना कारण विचारले असता कामाचा वाढता व्याप व कर्मचा-यांची अनुपलब्धता हे उत्तर त्यांनी दिले. सदर युक्तिवाद आयोगास मान्य नाही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी विलंब केला आहे हे सत्य शेवटी उरते आहे. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीपेक्षा १७ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील २० (१) मधील तरतुदीनुसार विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० याप्रमाणे एकूण १७ दिवस विलंबाकरिता रुपये ४२५० (रुपये चार हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती त्यांच्यावर लावण्यात येत आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) नुसार जन माहिती अधिका-यास ही माहिती पुरविणारे त्यांचे इतर कर्मचारी / अधिकारी हेही या प्रकरणी तितकेच जबाबदार ठरतात त्यांनाही या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याइतकेच जबाबदार धरले जावून या सर्वांवर रुपये ४२५० /- (चार हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीची कर्मचारी / अधिकारी निहाय विभागणी विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी यथायोग्यरित्या करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत सादर करावा.

या रकमेचा भरणा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत व एका हप्त्यात शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षा खाली करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे इतर सर्व अधिकारी यांचेवर त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे निश्चित केलेल्या विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये ४२५० /- (चार हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत शासकीय कोषागारात भरावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर सात दिवसाचे आत सादर करावा.

३. या शास्तीची कर्मचारी / अधिकारी निहाय विभागणी विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी यथायोग्यरित्या करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रदिप दादाराव वडतकर, सी - १४, विशाल अपार्टमेंट, ज्योतीनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक (१), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय अपर आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक (१), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

३. जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय रुग्णालय, अंबाजोगाई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जनअपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय, अंबाजोगाई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव,राज्य मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५५३

निर्णय दिनांक ०९-१०-२००७

श्री. स. वजिर स. अहमद, : अपिलार्थी
बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा ग्रामसेवक, लोणी खुर्द, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती
अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. स. वजिर स. अहमद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, लोणी खुर्द, तालुका अर्धापूर श्री. विनोद नथ्थुजीराव कोलपवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती

अर्धापूर श्री. सुभाष नारायण धनवे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत सन २००४ ते २५ फेब्रुवारी २००६ या कालावधीतील लोणी खुर्द आणि लोणी (बु.) येथील सिमेंटच्या नाली बांधकामासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये -- लोणी खुर्द आणि लोणी बु. येथील सिमेंटचे नाली बांधकाम किती झाले व कोठून कोठपर्यंत झाले. ग्रामपंचायतच्या ग्रामसेवकाने मोजमाप घेतलेल्या (एम. बी.) पुस्तकाच्या सत्यप्रती मिळणे – या माहितीचा समावेश आहे.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास प्रतिसाद म्हणून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक दिनांक ०५-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेल्या पत्रावर जरी तारीख ०५-०४-२००६ असली तरी हे पत्र त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०४-२००६ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पत्रावरुन दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती ग्रामपंचायत लोणी खुर्द आणि लोणी बु. येथील ग्रामपंचायतच्या भितीवर लावून या कामास पुर्वी प्रसिध्दी देण्यात आल्याने ही माहिती अपिलार्थीस देण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

तथापि सदरील पत्र अपिलार्थी यांना प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले आहे. सदर पत्र अपिलार्थीस पोहोचल्याची पोस्टाची प्रत जन माहिती अधिकारी आयोगासमोर सादर करु शकले नाही.

यावर समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपिलाची सुनावणी संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०७-२००६ रोजी घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या सुनावणी संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी वेगळे असे कोणतेही आदेश पारीत केलेले आढळून येत नाही. तथापि त्यांच्या कार्यालयीन नस्तीमध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस सुनावणीच्या वेळी दिल्याचा उल्लेख आहे व त्या मजकुराखाली अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या सह्या आहेत. याच टिपणीच्या तळभागात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचा निर्णय होऊन हे प्रकरण बंद करण्यात येत आहे असे त्यांचे अभिप्राय दिले आहेत. कोणत्याही अपिलाची सुनावणी कशी होऊ नये त्याचा उत्तम नमुना म्हणजे या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली सुनावणी असे येथे म्हणावे लागेल. अशा प्रकरणी "अपील ठरविणे" या प्रक्रियेमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन नोंदवून घेऊन त्यावर आपला निर्णय लेखी स्वरुपात पारीत करणे अपेक्षित आहे. तथापि उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती विनामूल्य देण्याचे ठरल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्या सुनावणीच्या टिपणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांचे कोणतेही स्पष्ट आदेश नाहीत असे येथे सखेद नमूद करावेसे वाटते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सुनावणीमध्ये माहिती देण्याचा निर्णय होऊनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ०४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये स्मरण दिले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये दिनांक २८-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली असून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना व्दितीय अपील करेपर्यंत मिळाली नसल्याचे कारण दर्शविले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक १७-०३-२००६ रोजी अर्ज करुन आजतागायत व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेपर्यंत देखील त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कडून मिळाली नाही. ही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे व जन माहिती अधिकारी यांनाही स्मरणपत्र पाठविले होते तथापि त्याचा काहीही उपयोग झाला नाही त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी व त्यांनी मागितलेली मूळ माहिती त्यांना विनामूल्य मिळावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी सुनावणीच्या दिवशी संबंधीत गट विकास अधिकारी यांच्या समक्ष अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०५-२००६ रोजी केलेला खुलासा आयोगास दाखविला. या खुलाशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी दहा दिवस इतका विलंब झाला असल्याचे कबूल केले आहे. तथापि याचबरोबर अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असल्यामुळे ते अपिलार्थीची वाट पाहत राहिले असेही त्यांचे म्हणणे त्यांनी या स्पष्टीकरणमध्ये दिलेले आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यास दहा दिवसांचा विलंब झाला आहे व ही माहिती घेऊन जाण्यासाठी अपिलार्थी व्यक्तिशः त्यांच्याकडे हजर झाले नाहीत हे दोन्ही मुद्दे विचारात घेणे जरुरीचे आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे सादर करण्यात आलेल्या एकूण कागदपत्रावरुन व त्यांचे म्हणणे लक्षात घेता त्यांच्यावर दंडनीय कारवाईची कार्यवाही करणे आयोगास योग्य वाटत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती ज्यावेळी तयार झाली होती त्यावेळी त्याचप्रमाणे कळविणे अपेक्षित होते. त्यांनी माहिती तयार असल्याचे अपिलार्थीस कळविले नाही व दहा दिवस विलंबाने माहिती दिली व सदर माहिती अपिलार्थीस मिळाली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीमध्ये कर्तव्य परायणतेचा अभाव पुरेशा प्रमाणात सिध्द केला आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांनी वरील प्रमाणे दाखविलेल्या त्यांच्या कार्य शैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	जन माहिती अधिकारी यांच्यावर कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	०९-१०-२००७	राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१	श्री. स. वजिर स. अहमद, बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२	जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, लोणी खुर्द, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६	निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५५४

निर्णय दिनांक ०९-१०-२००७

श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी, : अपिलार्थी

रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड,

बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा सहकार आयुक्त व निबंधक सहकारी

संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अपर निबंधक (व. व. नि.), सहकारी

संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

सध्या : जन माहिती अधिकारी : उप निबंधक सहकारी संस्था, (प्रशासन), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, न्यू सेंट्रल बिल्डींग, पुणे - ०१

जन अपिलीय अधिकारी : अपर निबंधक, सहकारी संस्था, (प्रशासन), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, न्यू सेंट्रल बिल्डींग, पुणे - ०१

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, (प्रशासन) शुभांगी जोशी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था, (प्रशासन) यांचे प्रतिनिधी म्हणून जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, (प्रशासन) हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ च्या संदर्भात एकूण १२ मुद्दयांवर प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मुद्दा क्रमांक ७ व्दारे त्यांचा खुलासाही विचारल्याचेही दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कडे मागितलेल्या एकूण सर्व माहितीमध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १०१ च्या संदर्भात सहाय्यक निबंधक यांना प्रकरणे चालविण्यासाठी सहकार विभागाने वेळोवेळी काढलेली मार्गदर्शक परिपत्रके यांची माहिती वगळता उर्वरीत सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचालेली असून देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक असलेली सुसंगत अशी माहिती दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपिलाची सुनावणी दिनांक १०-०८-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी घेऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिल्याने त्यांचे अपील फेटाळले आहे. अपिलार्थीचे अपील फेटाळल्याचा निर्णय त्यांनी त्यांचे कडील दिनांक १८-०८-२००६ रोजीच्या आदेशान्वये पारीत केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्ण्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये दिनांक २९-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद आयोगाने घेतली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे अशाच प्रकारच्या प्रश्नार्थक स्वरुपातील माहितीची त्यांच्याकडे वारंवार मागणी करत असून त्यांच्याकडे अपिलार्थीने ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कोणतेही आवश्यक ते शुल्क, भरण्याची त्यांनी सूचना करुनही ते, भरले नाही. अपिलार्थीने मुख्यत्वे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १०१ चे स्पष्टीकरण (interpretation) जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितले आहे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांना अर्ध

न्यायिक प्राधिकरण म्हणून सहकार कायद्यान्वये प्राधिकृत केले आहे. प्रत्येक प्रकरणनिहाय संबंधीत सहाय्यक निबंधक कायद्याच्या कलमांचा योग्य तो अर्थ काढून उपलब्ध पुरावा व परिस्थितीनुरुप आपले निर्णय देत असतात त्यामुळे एखाद्या कलमाचे स्पष्टीकरण करुन कायद्यातील तरतुदींचे निश्चित स्वरुपाच्या नियमात रुपांतर करता येणार नाही कारण त्यामुळे सहाय्यक निबंधकाच्या निवाडा देण्याच्या स्वातंत्र्यावर अप्रत्यक्षपणे बंधन येईल व आपला कोणताही निर्णय ते स्वतंत्रपणे व निःपक्षपातीपणे देऊ शकणार नाहीत. सबब अपिलार्थीने मागितलेले कलम १०१ चे ठराविक साच्याचे स्पष्टीकरण त्यांना देता येणे शक्य नाही.

वरील युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांना जरी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असली तरी आवश्यक ते खुलासा करुन त्यांनी अपिलार्थीचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलार्थीने मागितलेली बहुतांश माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या व्याख्येत बसत नसल्याने जन माहिती अधिका-यास ती माहिती अपिलार्थीस देता येणे शक्य नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केलेली, सहाय्यक निबंधक यांचे कार्यपध्दतीसंदर्भात सहकार खात्याकडून वेळोवेळी जारी केलेली परिपत्रके, आदेश यांच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी यापुर्वीच पुरविल्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या आदेशाच्या प्रती पुरवून त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविली असल्याकारणाने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे. आयोगाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व जन माहिती अधिकारी यांच्या उपरोक्त युक्तिवादावरुन आयोग याच निर्णयाप्रत आला आहे.

तेव्हा जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयात बदल करण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन दिसत नाही. सबब, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी, रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, (प्रशासन), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, न्यू सेंट्रल बिल्डींग, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था, (प्रशासन), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, न्यू सेंट्रल बिल्डींग, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/०६

निर्णय दिनांक १०-१०-२००७

श्रीमती भागीरथीबाई ताकसाळी, : अपिलार्थी

१६, सिताराम सदन, रामनगर, फायर

ब्रिगेडच्या मागे,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा सहाय्यक संचालक,

नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद

सध्या : जन माहिती अधिकारी : प्रभारी उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती भागीरथीबाई ताकसाळी यांचे वतीने

श्री. विमलकिशोर श्रीरामजी सिंघानिया (यापुढे त्यांना अर्जदार असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा प्रभारी उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका श्री. प्रशांत लक्ष्मीकांत विटेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका हे गैरहजर आहेत.

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक १४-०३-२००७ रोजी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना त्यांचे दिनांक ०७-१२-२००५ च्या माहितीच्या अर्जामध्ये मागणी केलेल्या माहिती संदर्भात पूरक माहिती देण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थी हे राज्य माहिती आयोगाच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता गेले असता सदर माहिती व ही माहिती ज्या नस्तीमध्ये आहे अशी नस्ती अपिलार्थीस दाखविण्यास जन माहिती अधिकारी यांनी नकार दिला असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे व त्यामुळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ खाली राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००७ रोजी तक्रार केली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-१०-२००७ च्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगास असे कळविले आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००७ रोजीच माहिती दिली असून ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीने स्विकृत केली आहे.

आज अपिलार्थीने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे टिपण राज्य माहिती आयोगास दाखविले असता त्यामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नोत्तरे स्वरुपात आहे. प्रश्नोत्तरे स्वरुपात माहिती देण्याचे माहिती अधिकार कायद्यात बसत नाही. त्यांनी अपिलार्थीस संबंधीत प्रकरणाची नस्ती अवलोकनास्तव देऊ केली असता त्यावेळी त्यांना आवश्यक वाटतील अशा कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती घेण्यासाठी अपिलार्थी यांनी नकार दिला.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला असता असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी स्वतः वैयक्तीक लक्ष घालून अपिलार्थीस योग्य तो निर्णय द्यावा. आयुक्तांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थीने सचिव (नगरविकास) मंत्रालय, मुंबई यांच्याकडे आपली तक्रार मांडावी.

दिनांक १४-०३-२००७ च्या सुनावणीच्या वेळी अर्जदाराच्या भुखंडावर केलेले अतिक्रमण हटविण्याकरिता औरंगाबाद महानगरपालिकेने श्री. प्रेम तोतला यांना आवश्यक ती नोटीस दिल्यानंतर या नोटीसच्या विरुध्द श्री. प्रेम तोतला यांनी न्यायालयात जाऊन स्थगिती मिळविली आहे व सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले होते. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर स्थगिती ही त्यांच्या प्लॉट संदर्भात नसून ती दुस-या प्लॉट संदर्भात आहे व जन माहिती अधिकारी यांनी आयोगास खोटी माहिती देऊन आयोगाची दिशाभूल केली आहे.

अपिलार्थीचे हे म्हणणे आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वतः तपासून त्याप्रमाणे त्यांनी आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचा तक्रारी अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी स्वतः वैयक्तीक लक्ष घालून अपिलार्थीस योग्य तो निर्णय द्यावा. आयुक्तांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थीने सचिव (नगरविकास) मंत्रालय, मुंबई यांच्याकडे आपली तक्रार मांडावी.

३.	अपिलार्थीचे यांचे म्हणणे आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वतः तपासून त्याप्रमाणे त्यांनी आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठवावा.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	१०-१०-२००७	राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१	श्रीमती भागीरथीबाई ताकसाळी, १६, सिताराम सदन, रामनगर, फायर ब्रिगेडच्या मागे, औरंगाबाद

२	जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६	निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४९५

निर्णय दिनांक १०-१०-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी,<br>सम्राट चौक, श्रीकृष्णनगर,<br>लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,<br>रोहिला, तालुका चाकूर,<br>जिल्हा लातूर | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>चाकूर, जिल्हा लातूर | : | प्रतिवादी |

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची व्दितीय सुनावणी आज दिनांक १०-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रोहिला, तालुका चाकूर व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर हे सर्व गैरहजर

आहेत. या प्रकरणाची प्रथम सुनावणी दिनांक ०६-०३-२००६ रोजी ठेवली असता देखिल वरील पैकी कोणीही हजर राहिले नाहीत.

वरील प्रकरणाची आज दिनांक १०-१०-२००७ रोजी दुसरी सुनावणी असून या सुनावणीसाठी हजर राहण्यासाठी सर्व संबंधितांना (अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी) पोलीस अधीक्षक, लातूर यांच्यामार्फत बोलावणे पाठवूनही आजही कोणीही उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे हे अपील उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन ठरविण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ३०-०८-१९७९ ते ०६-०२-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. " दिनांक ३०-०८-१९७९ रोजी झालेल्या ग्रामपंचायत बैठकीचे इतिवृत्त (प्रोसीडींग) ची नक्कल,

२. उक्त इतिवृत्ताच्या ठराव क्र. ३ आधारे ग्रामपंचायत रजिस्टर घर नं. २८९ ची नोंद घेतल्याची सत्यप्रत,

३. उक्त ठरावाआधारे घर नं. २८९ पैकी हिस्सा नं. २ ची केलेली नोंद (नमुना नं. ८ मध्ये) सत्यप्रत,

४. दिनांक १२-०२-१९९७ रोजी ग्रामपंचायत पावती क्र. १३३ प्रमाणे त्या अगोदर (तीन वर्ष) नळ बंद असताना देखील ग्रामपंचायतीने (२८०/- रुपये) दोनशे ऐंन्सी रुपये पाणीपट्टी (बेबाकी प्रमाणपत्र) मिळवण्यास गेले असता भरुन नळ बंद असतांना घेतले. (त्यापुर्वी ३ वर्षे नळ बंद) व आजतागायत पाणी नळ बंद आहे

मग या घरावर पाणीपट्टी आकारणी केली जात आहे काय, याची माहिती द्यावी. पाण्याचा नळ चालू नसतांना आजही पाणीपट्टी आकारणी चालू असल्यास नळ मला कधी चालू करुन देणार हेही निवेदीत करावे. ”

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीच माहिती दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

यावर अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले व या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांनी केलेल्या अपील अर्जातील त्रुटी त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये दर्शविल्या आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्रास उद्देशून अपिलार्थीने दिनांक ०७-०६-२००६ रोजी त्याचे उत्तर देवून त्यांच्याकडे दर्शविण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता केली.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०७-२००६ रोजी सुनावणी आयोजित केल्याचे दिसून येते तथापि सुनावणी झाली किंवा कसे व झाली असल्यास त्या सुनावणीमध्ये काय निर्णय झाला हे कळण्यास, संबंधीत कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे व संबंधितांच्या गैरहजेरीमुळे कळणे अशक्य आहे.

अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील केलेल्या प्रथम अपिलातील त्रुटींची पुर्तता केल्यानंतरही जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपीलाची सुनावणी घेतली नाही असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपीलावर कोणताच निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये दिनांक ०५-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना आतापर्यत ही माहिती मिळाली आहे किंवा कसे याबाबत सर्व संबंधितांच्या गैरहजरीमुळे काहीच कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीच माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही, कारण जर अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना प्राप्त झाली असती तर त्यांनी पुढे जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे प्रथम अपील व व्दितीय अपील केले नसते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही, आयोगाकडे दोनदा बोलावून देखील ते सुनावणीस अनुपस्थित राहिले आहेत. आयोगाकडील सुनावणीचे पत्र जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेमार्फत जन माहिती अधिकारी यांना पाठविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी या सुनावणी प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देऊन व आयोगासमोर दोनदा अनुपस्थित राहून आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण

२५००० रुपये इतकी शास्ती का लावण्यात येऊन त्याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात सादर करावा.

संबंधीत ग्रामसेवकाने त्यांच्या कार्यशैलीतील दाखविलेला बेजबाबदारपणा व कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याबद्दल, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, लातूर यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत आयोगास पाठवावा त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असेही पुढे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, लातूर यांनी जन माहिती अधिकारी यांच्या वर त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाईबाबत व कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्या वर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे कारवाई करुन आपला अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत आयोगास पाठवावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्या वर माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) प्रमाणे प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगास लेखी स्वरुपात सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी, सम्राट चौक, श्रीकृष्णनगर, लातूर (By R.P.A.D.)

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रोहिला, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५६१

निर्णय दिनांक ११-१०-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. दिनेश भास्करराव पोतदार,<br>मु. पो. ढाकी दत्तनगर, तालुका जिल्हा<br>उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, उस्मानाबाद<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),<br>उस्मानाबाद जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दिनेश भास्करराव पोतदार हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद श्री. रत्नदिप रामचंद्र गायकवाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय

अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद श्री. विकास वामनराव नाईक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावरील कारवाई संदर्भात, दिनांक ०८-०५-२००६ ते १२-०६-२००६ कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

५. " मी दिनांक ०८-०५-२००६ रोजी दिनांक १२-०६-२००६ रोजी संजय गांधी निराधार योजनेतंर्गत अपंगाची पेन्शन पूर्ववत चालू करण्याबाबत अर्ज दिले आहेत. सदर दोन्ही अर्जावर केलेली कार्यवाही कार्यालयीन टिपणीसह मूळ अर्ज त्याची छायाप्रत द्यावी. "

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यानी संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक झाली नसल्याने पुढील बैठकीमध्ये अपिलार्थीचा अर्ज योग्य त्या कार्यवाहीस्तव ठेवला जाईल अशी माहिती अपिलार्थीस देऊन अपिलार्थीचा अर्ज निकाली काढत असल्याचे त्यांना कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००६ अन्वये प्रथम अपील केले व या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्या वर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांनी दिनांक १५-०९-२००६ रोजी निर्णय घेऊन सदर निर्णय त्याच दिवशी पारीत केला आहे. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या अर्जाची सद्यस्थिती त्यांना कळविण्याची सूचना दिली. तथापि तत्पुर्वीच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अनुदानासंबंधीचा अर्ज मंजूर झाल्याचे त्यांच्याकडील दिनांक ०३-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगा कडे दिनांक ०३-११-२००६ अन्वये व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी संजय गांधी निराधार योजनेतंर्गत त्यांना नियमितपणे अनुदान मिळालेले नाही असे नमूद केले आहे. सदर अनुदान त्यांना कोणत्या आदेशाव्दारे मिळाले, नंतर कोणत्या आदेशान्वये बंद झाले व कोणत्या आदेशाप्रमाणे परत मिळाले हे जाणून घ्यावयाचे आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व आयोगाकडून अपेक्षित केलेली माहिती यातील दोन्ही विषय पूर्णपणे भिन्न असल्याचे दिसून येते. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे त्यांच्या तक्रार अर्जाच्या प्रतीची व या तक्रारीशी संदर्भित केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपेक्षिल्या आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या तक्रार अर्जाची सद्यस्थिती वेळोवेळी कळविल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून ते ती माहिती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलार्थी त्यातील पत्रव्यवहार पाहता अपिलार्थीस, त्यांनी केलेल्या तक्रारी अर्जाच्या मूळ प्रती व त्या

संदर्भात केलेल्या कारवाईच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहेत तर जन माहिती अधिकारी यांनी तक्रार अर्जावर काय कारवाई केली ते अपिलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती न देण्यामध्ये कोणताही असद्‌हेतू होता किंवा ही माहिती देण्याची त्यांनी टाळाटाळ करण्याचे काहीही कारण नव्हते कारण अपिलार्थीने मूळातच जी माहिती मागविली होती तिचे स्वरुप पाहता -- अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अर्जातील माहिती संदर्भात कोणतीही गोपनीयता ठेवण्याचे जन माहिती अधिका-यास काही प्रयोजन नव्हते असे आज झालेल्या युक्तिवादामध्ये दिसून आले आहे.

तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

शासनाने संजय गांधी निराधार योजना संदर्भात २००२ व २००३ मध्ये पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कारवाई केली आहे. या दोन्ही आदेशा मधील निकषांचे स्वरुप काही अंशी वेगवेगळे असल्यामुळे काही कालावधीकरिता संजय गांधी निराधार योजने अंतर्गत काही व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळू शकला नाही ही वस्तुस्थिती आहे. अपिलार्थीस या योजनेचा लाभ ज्या काळात मिळाला नाही त्या काळात ते लाभ अपिलार्थीस का मिळू शकले नाहीत हे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलावून समजावून सांगावे व त्यांच्या म्हणण्याप्रित्यर्थ उपलब्ध असलेली, त्यांच्या कडील माहिती अपिलार्थीस त्यांनी विनामूल्य द्यावी हेही या प्रकरणी त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिनेश भास्करराव पोतदार, मु. पो. ढाकी दत्तनगर, तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५७१

निर्णय दिनांक    ११-१०-२००७

श्री. लक्ष्मण बळवंतराव देशमुख : अपिलार्थी
उर्फ निंबाळकर,
"जुनी हवेली", मु. पो. तालुका वाशी जिल्हा
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
उस्मानाबाद जिल्हा उस्मानाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. लक्ष्मण बळवंतराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर श्री. सखाराम चंपतराव येवलीकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद श्री. विकास

वामनराव नाईक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये तहसील कार्यालय तुळजापूर यांच्याकडे मौजे तडवळे तालुका तुळजापूर येथील जमीन गट नंबर ४६ व ११० च्या वहितीसंबंधी सन २००५ ते २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

६. “ मौजे तडवळे येथील गट नंबर ११० चे जमीन वहिवाटदार यांचे नकाशासह हिस्से नमूद करुन प्रत्यक्षरित्या वहिवाटीत असणारे क्षेत्र किती ते स्पष्ट करा.

७. मौजे तडवळे तालुका तुळजापूर येथील जमीन गट नंबर ४६ मधील किती क्षेत्र प्रत्यक्षरित्या वहिवाटीसाठी उपयोगात आणले त्याबाबत स्पष्टीकरण करा. ”

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

सदर अर्ज तहसीलदार तुळजापूर यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०४-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस संबंधीत माहितीसाठी गाव कामगार तलाठी तडवळे हे प्रत्यक्षात माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडे माहिती संदर्भात अर्ज करुन माहिती हस्तगत करण्यास सुचविले.

तहसीलदार तुळजापूर यांची सदर कृती चुकिची असून त्यांनी अपिलार्थीबरोबर या प्रमाणे पत्रव्यवहार न करता संबंधीत माहिती ज्या जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध आहे त्यांच्या कडे अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवावयास हवा होता व त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी कळवावयास हवे होते, तथापि या प्रकरणी त्यांनी तशी कृती केल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात त्याच दिवशी प्राप्त झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अपिलावर कोणतीही सुनावणी झाली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीच्या या अर्जावर दिनांक १५-०६-२००६ रोजी सरळ आदेश निर्गमीत केले आहेत असे त्यांनी आयोगासमोर सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी सुनावणी न घेण्याचे कारण विचारले असता त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्याच्या सूचना आदेशाच्या सुनावणी निकालामध्ये सूचित केल्या असल्यामुळे व वेळ वाचविण्यासाठी ही कारवाई केली असे आयोगास स्पष्टीकरण केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादा बद्दल कोणतीही शंका घेता येत नसली तरी येथून पुढे, जरी सकृतदर्शनी माहिती देता येणे शक्य असले व त्यादृष्टीने आदेश प्रस्तावित असले तरीही प्रकरणनिहाय जन माहिती अधिकारी व अर्जदार यांना बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून त्यांनी आपला निर्णय द्यावा म्हणजे तदनंतर अपिलदारास कोणताही आक्षेप घेता येणार नाही याप्रमाणे सूचित करण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगा कडे दिनांक १२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश रद्द करण्याची व त्यांनी अर्जाव्दारे मागणी केलेले स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी व तहसीलदार यांना देण्यास भाग पाडावे अशी विनंती केली आहे. त्यांनी आयोगाकडे केलेल्या अर्जात पुढे जन माहिती अधिकारी व

रेकॉर्ड किपर, तहसील कार्यालय यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) प्रमाणे कारवाईचे आदेश निर्गमीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी तहसीलदार तुळजापूर यांच्या कार्यालयातील ‘‘सेतू’’ या सुविधा केंद्रामार्फत ७/१२ उतारा मागितला असता त्यात दर्शविण्यात आलेले उपरोक्त जमिनीचे क्षेत्रफळ व त्यांनी प्रत्यक्षात संबंधीत तलाठी यांच्याकडून प्राप्त करुन घेतलेला ७/१२ उतारा यामध्ये दर्शविलेले क्षेत्रफळ यामध्ये विसंगती आहे त्यामुळे त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकिची आहे. तेव्हा त्यांना सत्य स्वरुपात असलेली माहिती महसूल यंत्रणे-कडून अभिप्रेत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने निदर्शनास आणलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळा-संबंधीच्या व लागवडीच्या क्षेत्राफळासंबंधीच्या विसंगती मान्य केल्या, तथापि ही तांत्रिक चूक असल्याचे त्यांनी पुढे आयोगास स्पष्ट केले. महसूल विभागातर्फे त्यांच्या कार्यक्षेत्राकरिता वेगवेगळ्या कार्यालयामध्ये ‘‘सेतू’’ प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पामुळे नागरिकास त्यांना महसूल विभागाकडून आवश्यक असलेली माहिती संगणकाव्दारे त्वरीत उपलब्ध होऊ शकते. तहसीलदार तुळजापूर यांच्याकडे ‘‘सेतू’’ ही योजना ज्या खाजगी यंत्रणेकडून राबविण्यात येत आहे, त्या खाजगी यंत्रणेकडील कर्मचा-यांनी संगणकामध्ये डेटा फिड करत असतांना त्यांच्याकडून झालेली ही चूक आहे. अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये तलाठी व ‘‘सेतू’’ यांच्याकडून प्राप्त होणा-या माहितीतील विसंगती ३ दिवसात दूर करण्याचे तहसीलदार तुळजापूर यांनी आयोगासमोर कबूल केले.

वरील वस्तुस्थिती, व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीस विसंगत माहिती देण्यामध्ये तहसीलदार तुळजापूर यांचा कोणताही असद्‌हेतू नव्हता. अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीमधील विसंगती त्यांनी कबूल केली असून ही

विसंगती ३ दिवसात दूर करण्याचे त्यांनी आयोगास व अपिलार्थीस आश्वासन दिले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासेवजा स्पष्टीकरण मागितले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केलेली आहे. त्यानुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण देणे अभिप्रेत नाही हे अपिलार्थीस समजावून सांगण्यात आले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पष्टीकरण का मागितले असे विचारले असता, त्यांनी शासना-तर्फे दरमहा प्रसिध्द होत असलेल्या "लोकराज्य" या मासिकाचा डिसेंबर २००५ चा अंक व त्यामधील पृष्ठ क्रमांक ४ वरील श्रीमती लता राजे या लेखिकेने दिलेल्या लेखाचा संदर्भ दिला. या लेखामध्ये सामान्य नागरिकास स्पष्टीकरण विचारण्याचा हक्क आहे अशा अर्थाचे विधान केले आहे. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या वर म्हटल्याप्रमाणे पुरेशी स्पष्ट केली आहे त्यामध्ये स्पष्टीकरण अभिप्रेत नाही. परंतु उत्साहाच्या भरात संबंधीत लेखिकेने या लेखात केलेले विधान हे चुकिचे आहे असे आयोगाचे मत आहे. अशा प्रकारचे लेख,विशेषतः ज्यामध्ये कायदेशीर तरतुदींचे स्पष्टीकरण, त्यावरील अभिप्राय व खुलासे इत्यादी बाबींचा समावेश आहे ते प्रसिध्द करतांना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने विशेषतः मुख्य संपादक व संपादक यांनी काळजी घेतली पाहिजे असे येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

आपल्या मासिकातील लेखाव्दारे जन सामान्यांचे प्रबोधन करत असतांना कायद्यातील तरतुदीविषयी या प्रबोधनाव्दारे त्यांना येथून पुढे चुकिचे संकेत दिले जाणार नाहीत याची दक्षता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने घ्यावी. आयोगाच्या या शे-याची योग्य ती

दखल माहिती व जनसंपर्क महासंचालनालय घेईल एवढी माफक अपेक्षा आयोग त्यांच्याकडून करत आहे.

वरील प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यासाठी केलेली कारवाई चुकिची आहे. त्यांनी येथून पुढे त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ खाली माहितीसाठीचे अपिल अर्ज प्राप्त झाल्यास त्यांचा निपटारा करण्यासाठी विशेष सतर्क राहावे असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

महसूल विभागातर्फे "सेतू" प्रकल्प मोठ्या प्रमाणात राबवून त्याची प्रसिध्दीही महसूल यंत्रणेकडून मोठ्या प्रमाणात केला गेली आहे. उपरोक्त प्रकरणातील वस्तुस्थिती पाहता अनेक जमीनधारकांच्या ७/१२ उता-यासंदर्भात उपरोक्त प्रकरणातील विसंगती प्रमाणे विसंगती असण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता उपस्थित जन माहिती अधिकारी यांना काय करता येईल याची विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, महसूल विभागा-तर्फे दरवर्षी 'महसूल अभियान' नावाचे एक विशेष अभियान एक महिन्याकरिता राबविले जाते. या अभियाना व्दारे प्रत्येक गावच्या ७/१२ उता-याचे सामुहिक वाचन होते व त्यामध्ये जर काही विसंगती असेल तर ती, संबंधीत महसूल यंत्रणेच्या अधिका-याच्या निदर्शनास आणून, तदनंतर जमिनधारकाच्या विनंतीचा विचार करुन त्या प्रकरणाचा यथायोग्य निपटारा केला जातो. तथापि फक्त एक महिन्याकरिता हे अभियान चालवून परिस्थितीमध्ये फार फरक पडेल असे वाटत नाही, कारण उस्मानाबाद जिल्ह्यात, जिल्ह्यातील सर्व तालुक्यात यापुर्वी देखील अशा प्रकारची अभियाने राबविली गेली असणारच, तथापि अशा प्रकारची अभियाने राबवून देखील आजमितीस अपिलार्थीने दर्शविल्याप्रमाणे माहितीमध्ये विसंगती आस्तित्वात आहे. तेव्हा सचिव (महसूल) यांना आयोगास अधिनियमातील कलम 19 (8) (a) (iv) अन्वये आयोगास प्राधिकृत केल्याप्रमाणे असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडील कागदोपत्री उपलब्ध असलेली

माहिती व ‘‘सेतू’’ योजना राबविणा-या खाजगी यंत्रणाव्दारे नागरिकांना पुरविलेली माहिती यांची पडताळणी एका वेगळ्या अभियानाव्दारे अथवा दुस-या कोणत्याही यंत्रणेमार्फत केल्यास त्याचा जनतेस बिनचूक माहिती मिळण्यासाठी अधिक उपयोग होईल. तेव्हा यादृष्टीने त्यांनी त्यांच्याकडील क्षेत्रीय अधिका-यांना आदेश दिल्यास जन सामान्यास महसूल यंत्रणेकडून अचूक व वस्तुस्थितीदर्शक माहिती मिळणे सुकर होईल.

वरील प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी कोणत्याही प्रकारे हेतूपुरस्सर टाळाटाळ केली किंवा असद्हेतुने माहिती देण्याचे टाळले गेले अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आढळून न आल्याने याबाबत अशी कोणतीही कारवाई नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती अचूकरित्या हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये तलाठी व ‘‘सेतू’’ यांच्या कडून प्राप्त झालेल्या माहिती तील विसंगती ३ दिवसात दूर करावी.

४. सचिव (महसूल) त्यांनी त्यांच्याकडील कागदोपत्री उपलब्ध असलेली माहिती व ‘‘सेतू’’ योजना राबविणा-या खाजगी यंत्रणाव्दारे नागरिकांना पुरविलेली माहिती यांची

पडताळणी एका वेगळ्या अभियानाव्दारे अथवा दुस-या कोणत्याही यंत्रणेमार्फत करुन घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण बळवंतराव देशमुख उर्फ निंबाळकर, "जुनी हवेली", मु. पो. तालुका वाशी जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, १७ वा मजला, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ अपर मुख्य सचिव, (महसूल), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५७७

निर्णय दिनांक ११-१०-२००७

१ श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, : अपिलार्थी

मु. पो. तालुका अंबड, जिल्हा जालना

२ ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे,

मु. पो. पावसेपांगरी, तालुका अंबड,

जिल्हा जालना

३ श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके,

मु. आलमगाव, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग क्रमांक २, जालना
जिल्हा जालना

सध्याः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, ज्ञानदेव

गणपराव सुबुगडे, श्रीमंत विश्वनाथराव शेळके (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ श्री. सलीम गुलाब शेख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजना कामासंदर्भात, २००३-०४, २००४-०५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " आपल्या कार्यालयामार्फत घनसावंगी तालुक्यात रोहयोची कामे झाली आहेत त्या कामांची सद्याची परिस्थिती काय ? आपल्या कार्यालयामार्फत या वर्षात किती रक्कम खर्च झाली आहे, त्याची कामनिहाय यादी तसेच त्या कामावर उपस्थित असलेल्या मजुरांची संख्या, गाव व नांवनिहाय, त्यांना दिलेल्या कामाचा मोबदला नगदी व धान्य स्वरुपात व हजेरीपटाची नक्कल. "
>
> सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांना हव्या असलेल्या माहितीचे वर्णन " रोहयो अंतर्गत झालेल्या कामाची हजेरीपटाची नक्कल " असे केले आहे.

हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २५-०४-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात आला नाही.

यावर समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक २९-०५-२००६ रोजी प्राप्त झाला. त्यावेळी जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना हे कार्यरत होते. अपिलार्थीने सदर अपील उपविभागीय अधिकारी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी यांच्याकडे केले होते. अपिलार्थीने सदर अपील चुकिच्या प्राधिकरणाकडे केले होते त्यामुळे सदर अपील अर्ज तत्कालीन उप विभागीय अधिका-याकडून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ जालना यांच्या कडे पाठवावयास हवा होता, तथापि त्यांनी अशी कोणतीही कृती केली नाही. या अपिलामध्ये अपिलार्थीने आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज प्राप्त न झाल्याने त्यांना यावर सुनावणी घेता आली नाही असे जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०८-२००६ अन्वये व्दितीय अपील केले. आयोगाकडे केलेल्या या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मिळविण्यामध्ये अद्यापही स्वारस्य आहे. सदर माहिती त्यांना दिनांक १०-१०-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून व्यक्तिशः प्राप्त झाली असून ही माहिती अद्याप त्यांना तपासावयाची आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याप्रित्यर्थ लावलेल्या विलंबाबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

तरतुदीनुसार त्यांच्यावर कलम २० (१) व २० (२) अन्वये कारवाई करावी असाही त्यांनी पुढे युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिली आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. तव्दतच, पुढे हा विलंब क्षमापित करुन त्यांना आयोगाने क्षमा करावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात, सरकारी यंत्रणा कोणत्या पातळीपर्यत अनादर व्यक्त करु शकतात याचे, हे प्रकरण म्हणजे मुर्तीमंत उदाहरण आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०४-२००६ च्या अर्जामध्ये, जो जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २५-०४-२००६ रोजी प्राप्त झाला, त्या अर्जातील माहिती अपिलार्थीस दिनांक २४-०५-२००६ रोजी देणे अथवा त्या संदर्भातील काही निर्णय अपिलार्थीस देणे हे या कायद्याव्दारे अपेक्षित आहे. तथापि त्यांनी त्या ऐवजी दिनांक १०-१०-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे जो लेखी युक्तिवाद सादर केला आहे त्या मध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने दिनांक २८-०७-२००५ रोजी अर्ज करुन हीच माहिती मागितली होती. परंतु ही माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २२-०८-२००५ च्या पत्रान्वये नाकारण्यात आली होती. तशाच प्रकारची माहिती त्यांनी त्यांच्या उपरोक्त माहितीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील सक्षम अपिलीय अधिका-याकडे न करता सार्वजनिक बांधकाम उपविभाग घनसावंगी यांच्याकडेच केले आहे. अपिलार्थीने जरी चुकिच्या प्राधिकरणाकडे अपील केलेले असले तरी ते अपील सक्षम प्राधिकरणाकडे पाठविण्याची मुळात जबाबदारी संबंधीत उप

विभागीय अभियंता यांची होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता सदर अपील कार्यालयात विना कारवाई ठेऊन दिले. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती जरी मोठी असली तरी अपिलार्थीने जी माहिती मागितली आहे अशा प्रकारच्या माहितीचे नियमित संकलन प्रत्येक क्षेत्रीय यंत्रणा त्यांचे पातळीवर करत असते त्यामुळे अपिलार्थीस माहिती देणे हे मोठे जिकिरीचे काम होते असे आयोग मानत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये जन माहिती अधिकारी व अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्याकरिता त्यांचे जे इतर सहकारी जबाबदार आहेत त्यांना देखील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) अन्वये माहिती अधिकारी म्हणूनच संबोधण्यात यावे अशी तरतूद आहे. अपिलार्थीस माहिती देण्यापोटी विहित मुदती पेक्षा १ वर्ष ४ महिने १७ दिवस इतक्या कालावधीचा विलंब या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी लावलेला आहे. हा विलंब, जन माहिती अधिकारी यांची त्यावेळची मानसिकता पाहता, निश्चितपणे समर्थनीय व क्षमापीत करण्याच्या पात्रतेचा नाही असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. त्यांनी मांडलेली त्यांची बाजू व युक्तिवाद ऐकता त्यांतील एकही मुद्दा या विलंबाचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत करु शकत नाही ही वस्तुथिती आहे.

अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती मिळाली आहे हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना ही माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे इतर सहकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी त्यांनी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

या रकमेचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षाखाली करावा. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीची विभागणी अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत पाठवावा.

सदर शास्तीची रक्कम अपिलार्थी व त्यांचे सहकारी यांनी एकूण २ हप्त्यामध्ये भरावी. यापैकी पहिला हप्ता भरण्यासाठी अंतीम मुदत ३० नोव्हेंबर २००७ व दुसरा अंतीम हप्ता भरण्यासाठी अंतीम मुदत ३१ डिसेंबर २००७ अशी राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे इतर सर्व अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील निश्चित केलेल्या विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षाखाली एकूण २ हप्त्यामध्ये भरावी. यापैकी पहिला हप्ता भरण्यासाठी अंतीम मुदत ३० नोव्हेंबर २००७ व दुसरा अंतीम हप्ता भरण्यासाठी अंतीम मुदत ३१ डिसेंबर २००७ अशी राहील.

४.	जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीची विभागणी अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, मु. पो. तालुका अंबड, जिल्हा जालना
२ ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, मु. पो. पावसेपांगरी, तालुका अंबड, जिल्हा जालना
३ श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, मु. आलमगाव, तालुका अंबड, जिल्हा जालना
४ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५७५

निर्णय दिनांक १२-१०-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. अब्दुल रफीक अब्दुल रशीद,<br>भोईपुरा, आमृतेश्वर मंदिरासमोर,<br>जुना जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, मदिना तुल उलूम उर्दू<br>प्राथमिक शाळा, चंदनझिरा, जालना | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव, अफारुक सोशल ॲण्ड<br>एज्युकेशनल सोसायटी, जालना | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अब्दुल रफीक अब्दुल रशीद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिना तुल उलूम उर्दू प्राथमिक शाळा, चंदनझिरा श्री. अ. कादर अ. रऊफ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अफारुक सोशल ॲण्ड एज्युकेशनल सोसायटी हे गैरहजर आहेत. संस्थेचे अध्यक्ष श्री. अ. हमीद खान नवाज खान हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जून १९९५ ते सप्टेंबर २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

८. “ मदिना तुल उलूम उर्दू प्राथमिक शाळेच्या कर्मचा-यांचा उपस्थिती पट जून १९९५ ते सप्टेंबर २००६ पर्यत.

९. मदिना तुल उलूम उर्दू प्राथमिक शाळेतील कर्मचा-यांसाठी काढलेली सूचना (नोटीस) रजिस्टर जून १९९५ ते सप्टेंबर २००६ पर्यत.”

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविलेला सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सांगितले. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सदर अर्ज दिनांक ०९-०९-२००६ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असता हे पाकीट स्विकारण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारले. या प्रकरणी त्यांनी पोस्टाने पाठविलेले रजिस्टर्ड पाकीट आयोगास दाखविले. सदर पाकिटावर “सदर इसम मुख्याध्यापक घेण्यास इन्कार याकरिता परत” असा संबंधीत पोस्टमनचा दिनांक १५-०९-२००६ रोजीचा शेरा आहे. या पाकिटावर ०९-०९-०६, १०-०९-०६, ११-०९-०६, १२-०९-०६, १३-०९-०६, १४-०९-०६ अशा तारखांचा उल्लेख केला आहे. यावरुन संबंधीत पोस्टमन हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वारंवार गेले असता त्यांनी हे पाकीट स्विकारण्यास नकार दिला आहे हे स्पष्ट होते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सदर अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असता दिनांक २८-०९-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी सदर पाकीट

स्विकारण्यास नकार दिल्याचे या पाकिटावर संबंधीत पोस्टमनने दिलेल्या दिनांक ०५-१०-२००६ च्या शे-यावरुन दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील कृतीने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगा कडे दिनांक ०३-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

सदर माहिती अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १२ ऑक्टोंबर २००६ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना देखील याच पत्राने कळविली आहे. सदर पत्र जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागास प्राप्त झाल्याची नोंद त्यांनी आयोगास दाखविली.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना एका न्यायालयीन प्रकरणाकरिता आवश्यक आहे, ही माहिती देण्यास संबंधीत जन माहिती अधिकारी हे जाणुन-बुजून टाळाटाळ करत आहेत व अद्यापही ते आपल्या मूळ माहितीच्या मागणीवर ठाम आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आता दिनांक २०-०९-२००७ रोजी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती प्राप्त झाली आहे. या माहितीपोटी त्यांनी शुल्क रुपये २५० इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०७-०९-२००७ रोजी भरल्यानंतर ही माहिती त्यांना प्राप्त झाली. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती-पैकी मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील माहिती त्यांना पूर्णपणे मिळाली असून मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात जून १९९५ ते सप्टेंबर २००६ पर्यतच्या ऐवजी त्यांना ही माहिती जून २००१ ते २००६ पर्यतची मिळाली आहे म्हणजेच त्यांना जून १९९५ ते मे २००१ पर्यतची माहिती प्राप्त झाली नाही. म्हणजेच त्यांना प्राप्त झालेली माहिती अर्धवट असल्याचे त्यांनी वरील प्रमाणे उदाहरण देऊन सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०९-२००७ रोजी त्यांच्याकडून रुपये २५० इतके शुल्क आकारुन त्यांना माहिती दिलेली आहे. सदर माहिती पूर्ण नसल्याबद्दल त्यांना पुच्छा केली असता अपिलार्थीला त्यांनी मूळ अर्जात मागणी केलेली जी माहिती ते पुरवू शकले नाही ती माहिती ज्या कागदपत्रामध्ये उपलब्ध होती ती कागदपत्रे त्यांच्या पुर्वीच्या मुख्याध्यापकाने गहाळ केली असून ही कागदपत्रे गहाळ केल्याप्रकरणी त्यांनी संबंधीत मुख्याध्यापकावर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एफ.आय.आर. चा नंबर त्यांना विचारला असता त्यांनी त्यांना सदर नंबर स्मरणात नसल्याचे सांगितले.

वरील वस्तुस्थिती, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता या प्रकरणी शिक्षण संस्थेची भूमिका संशयास्पद वाटते. अपिलार्थी हे या संस्थेमध्ये जुलै २००० ते सप्टेंबर २००४ पर्यत लिपीक म्हणून कार्यरत होते असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. तदनंतर त्यांना सेवेतून कमी करण्यात आले व त्यासंबंधिचा त्यांचा दावा शालेय न्यायाधिकरणाकडे प्रलंबीत आहे. या दाव्यात युक्तिवाद करण्यासाठी सदर माहितीची त्यांना आवश्यकता आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सदर मुख्याध्याकावर एफ. आय. आर. दाखल करतेवेळेस संस्थेचे रेकॉर्ड गहाळ केल्यासंदर्भात त्या तक्रारीमध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. तेव्हा मुख्याध्यापक यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी शिक्षण संस्थेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने,संबंधीत मुख्याध्याकाने रेकॉर्ड गहाळ केल्यासंदर्भात दाखल केलेल्या एफ. आय. आर. ची एक प्रत अपिलार्थीस विनामूल्य द्यावी व जर संबंधीत मुख्याध्याकावर एफ. आय. आर. दाखल करतांना गहाळ झालेल्या कथित कागदपत्राची नोंद त्यामध्ये नसेल तर नवीन एफ. आय. आर. दाखल करावा व त्याची प्रत अपिलार्थीस द्यावी.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी जालना यांच्या १९-१०-२००६ च्या पत्रातील सूचनांचीही पायमल्ली केल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज व अपील स्विकारण्यासाठी संबंधीतांनी टाळाटाळ केल्याचे एकूण आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अशा प्रकारे सिध्द होत आहे. तेव्हा जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी अपिलार्थीचा अर्ज स्विकृत न केल्याबद्दल ताकीद देण्यात येत आहे व अपिलार्थीकडून माहिती देण्यापोटी वसूल केलेली रुपये २५० (रुपये दोनशे पन्नास) त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २४ तासाचे आत परत करावेत व इतःपर त्यांनी आपल्या कामकाजाच्या पध्दतीमध्ये सुधारणा करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील प्रकरणात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता संस्थेच्या कारभारातील पारदर्शकतेबाबत संशय घेण्यास भरपूर वाव आहे असे दिसून येते. या पार्श्वभूमीवर संबंधीत शिक्षण संस्थेची धर्मदाय आयुक्त व शिक्षण संचालक यांनी सखोल चौकशी त्वरीत करणे आयोगास जरुरीचे वाटते. तेव्हा या प्रकरणी त्यांनी प्राधान्याने लक्ष घालावे असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन मुख्याध्याकाने रेकॉर्ड गहाळ केल्यासंदर्भात दाखल केलेल्या एफ. आय. आर. ची एक प्रत अपिलार्थीस विनामूल्य द्यावी व जर संबंधीत मुख्याध्याकावर एफ. आय. आर. दाखल करतांना उपलब्ध असलेल्या

कागदपत्राची नोंद त्यामध्ये नसेल तर त्याची नोंद घेऊन नवीन एफ. आय. आर. दाखल करावा व त्याची प्रत अपिलार्थीस द्यावी.

३. अपिलार्थीस माहिती देण्यापोटी त्यांच्याकडून घेतलेले शुल्क रुपये २५० (रुपये दोनशे पन्नास फक्त) अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून जन माहिती अधिकारी यांनी २४ तासाचे आत परत करावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अब्दुल रफीक अब्दुल रशीद, भोईपुरा, आमृतेश्वर मंदिरासमोर, जुना जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिना तुल उलूम उर्दू प्राथमिक शाळा, चंदनझिरा, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अफारुक सोशल एज्युकेशनल सोसायटी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ धर्मदाय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ शिक्षण संचालक, (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५६५

निर्णय दिनांक १५-१०-२००७

१ श्री. देशमुख महमद हारुण अमिनमियॉ, : अपिलार्थी
न्यू देशमुख मेडिकल स्टोअर्स, सराफा मार्केट,
सिल्लोड, तालुका सिल्लोड
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, मौलाना अबुल कलाम
आझाद उर्दू हायस्कूल, घाटनांद्रा, तालुका
सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, मौलाना महमद अली जोहर
एज्युकेशन सोसायटी, सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

सध्याः जन अपिलीय अधिकारी : अध्यक्ष, मौलाना महमद अली जोहर एज्युकेशन सोसायटी, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. देशमुख महमद हारुण अमिन मियॉ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अबुल कलाम आझाद उर्दू हायस्कूल, घाटनांद्रा श्री. शेख इब्राहीम राज महमद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, मौलाना महमद अली जोहर एज्युकेशन सोसायटी श्री. शेख महमद कैसर आझाद अब्दुल गफूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौलाना महमद अली जोहर एज्युकेशन सोसायटी घाटनांद्रा तालुका सिल्लोड या संस्थेतील शिक्षिका यास्मीन पि. अशीकअली यांची ०१ जानेवारी १९९८ ते १० डिसेंबर २००५ या कालावधीमधील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. “ यास्मीन अशीकअली सदरील शिक्षिका आपल्या माध्यमिक उर्दू शाळेत सहशिक्षिका होत्या का ?

२. सह शिक्षिका म्हणून कार्य करीत असतील तर त्यांना दिलेले नियुक्तीपत्र,

३. त्यांनी हजर होण्यासाठी दिलेला जॉइनिंग रिपोर्ट,

४. त्यांची संच मान्यता,

५. वैयक्तीक मान्यता,

६. सह शिक्षिका म्हणून केलेल्या कार्यकाळाच्या साक्षांकीत सत्यप्रती मिळणेबाबत.”

अपिलार्थीने वरील सर्व माहिती साक्षांकीत प्रतीच्या स्वरुपात व रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०८-२००६ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटीचे रुपये ७० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यास सांगितले. सदर शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात मनीऑर्डरव्दारे भरल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगा समोर सांगितले. आवश्यक ते शुल्क भरणा केल्याची निश्चित तारीख त्यांना सांगता आली नाही. अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र दिनांक २१-०९-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व खोटी माहिती दिल्याचे व त्याचबरोबर कागदपत्राच्या प्रती साक्षांकीत करुन दिल्या नसल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीचे हे अपील जन अपिलीय अधिकारी जे या शिक्षण संस्थेचे सचिव आहेत त्यांच्याकडे पाठविल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-१०-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये या प्रकरणात प्रत्यक्षतः संस्थेचे अध्यक्ष हे जन अपिलीय अधिकारी आहेत असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी स्वतः तो अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे पाठविणे आवश्यक होते तथापि त्यांनी तसे न करता अपिलार्थीस या प्रकरणात वेगळा पत्रव्यवहार केलेला आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पत्रव्यवहारावरुन या प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिला वर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही सुनावणी घेतली गेल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले.

या अपिलामध्ये त्यांनी माहितीच्या साक्षांकीत प्रती मिळाल्या नाहीत, त्यांच्याकडून नियमबाह्य फी आकारण्यात आलेली आहे, खोटी माहिती पुरविण्यात आली असे म्हटले आहे. या अपिलात त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, कोणत्याही शैक्षणिक संस्थेचे सचिव हे अपिलीय अधिकारी असतात तथापि सदर संस्थेने संस्थेचे अध्यक्ष हे अपिलीय अधिकारी आहेत असे त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी कळविले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती खोटी आहे. सदर शिक्षिका या संस्थे-मध्ये जून १९९८ ते मे १९९९ व जून २००२ ते जुलै २००३ या २ सत्रामध्ये सह शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. संस्थेने त्यांना त्याप्रमाणे अनुभवाचे प्रमाणपत्र देखील दिले आहे. सदर प्रमाणपत्रे दिनांक ०६-०६-१९९९ आणि दिनांक ०१-०८-२००३ रोजी या दोन सत्रातील अपिलार्थीच्या सेवेसंदर्भात ही प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. अपिलार्थीने पुढे आयोगास असे सांगितले की, सदर शिक्षिका याच कालावधीमध्ये पुणे विद्यापिठामध्ये एम. एस. सी. ची नियमित विद्यार्थीनी म्हणून कार्यरत होती. असे असतांना याच कालावधीतील अनुभवाचे प्रमाणपत्र संस्थेने देणे म्हणजे असत्य माहिती पुरविली हे सिध्द होते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी आयोगासमोर सादर केलेल्या निवेदनामध्ये अपिलार्थीस माहिती देतांना त्यांच्या हातून संबंधीत शिक्षिकेच्या संदर्भातील त्यांनी केलेल्या दोन वेळच्या नेमणुकीचा उल्लेख करण्याचे चुकिने राहून गेले. त्याच बरोबर त्यांच्या शाळेतील शिक्षक ब-याच वेळा आपला पदव्युत्तर अभ्यास व शिक्षकाची नोकरी ही दोन्ही कामे एकाच वेळी करत असतात.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला असता व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः चुकिची माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी ती चूक आयोगास सादर केलेल्या युक्तिवादामध्ये कबूल केली आहे.  अपिलार्थीने आज आयोगासमोर सादर केलेला पुरावा पाहता संबंधीत शिक्षिका या शाळेत खरोखरच नोकरीस होती किंवा कसे याबाबत शंका घेण्यास भरपूर वाव आहे.  अपिलार्थीने त्यांच्या म्हणण्यापृष्ठ्यर्थ आयोगास जी कागदपत्रे सादर केली आहेत त्यामध्ये संबंधीत शिक्षिकेच्या सह्यामधील फरक आयोगाच्या निदर्शनास आणून दिला आहे हे पाहता या संस्थेच्या शिक्षक नेमणुकीच्या प्रक्रियेसंदर्भात उच्चस्तरीय चौकशी होणे आयोगास गरजेचे वाटते.  तेव्हा उप संचालक (शिक्षण), औरंगाबाद यांनी मौलाना महमद अली जोहर एज्युकेशन सोसायटी, सिल्लोड या संस्थेच्या संबंधीत शिक्षिकेच्या नेमणुकीसंदर्भात सखोल चौकशी करुन, आवश्यक वाटल्यास,या संस्थेवर प्रचलीत नियमानुसार / अधिनियमानुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी  असे त्यांना सुचविण्यात येत आहे. पुढे असेही आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकिची माहिती देऊन आपल्या कर्तव्यपरायणतेत कसूर केली आहे त्यामुळे त्यांच्यावर संबंधीत संस्थेने प्रचलीत सेवानियमानुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी.

उप संचालक (शिक्षण) यांचे संस्थेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमण्याचे आदेश असतांना या संस्थेत मात्र संस्थेचे अध्यक्ष, संस्थेने केलेल्या ठरावान्वये, जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.  उप संचालक (शिक्षण), औरंगाबाद यांनी त्यांच्या आदेशातील तरतुदी व संस्थेने त्यांच्या अध्यक्षांची जन अपिलीय अधिकारी म्हणून केलेली नेमणूक यांच्यातील वैधता तपासून पहावी.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या कडून घेतलेले रुपये वीस इतके जादा शुल्क त्यांना मनीऑर्डरव्दारे पाठविले होते तथापि अपिलार्थीने ती मनीऑर्डर स्विकारली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.  जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीकडून भरुन घेतलेल्या या शुल्कामध्ये याविषयासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराकरिता लागलेल्या पोस्टाच्या खर्चाचा देखील समावेश आहे तो त्यांनी अपिलार्थीस लावलेल्या एकूण शुल्कामधून वजा करुन उर्वरीत शुल्क अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २४ तासाच्या आत परत करावे.

सदरील शिक्षिका संस्थेच्या अभिलेख्याप्रमाणे तात्पुरती काम करत असल्यामुळे सदर शिक्षिकेच्या संच मान्यतेची, वैयक्तीक मान्यतेची प्रत इत्यादी तपशील संस्थेकडे नसणार त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही हे स्पष्ट होते व त्यामुळे ती अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकिची माहिती देऊन आपल्या कर्तव्यपरायणतेत कसूर केल्यामुळे त्यांच्यावर संबंधीत संस्थेने प्रचलीत सेवानियमानुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देशमुख महमद हारुण अमिनमियॉ, न्यू देशमुख मेडिकल स्टोअर्स, सराफा मार्केट, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मौलाना अब्दुल आझाद उर्दू हायस्कूल, घाटनांद्रा, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, मौलाना महमद अली जोहर एज्युकेशन सोसायटी, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप संचालक (शिक्षण), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५७९

निर्णय दिनांक १५-१०-२००७

१ श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, : अपिलार्थी
मु. पो. तालुका अंबड, जिल्हा जालना

२ ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे,
मु. पो. पावसेपांगरी, तालुका अंबड,
जिल्हा जालना

३ श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके,
मु. आलमगाव, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग,
घनसावंगी, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग,
जालना

| | | |
|---|---|---|
| सध्याः जन माहिती अधिकारी | : | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग,<br>घनसावंगी, जिल्हा जालना |
| जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, ज्ञानदेव गणपराव सुबुगडे, श्रीमंत विश्वनाथराव शेळके (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, घनसावंगी, श्री. विठ्ठलराव माणिकराव टेळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी

असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजना कामासंदर्भात, २००३-०४, २००४-०५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २१-०४-२००६ रोजी प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचे दिसून येते.

> " आपल्या कार्यालयामार्फत घनसावंगी तालुक्यात रोहयोची कामे झाली आहेत त्या कामांची सद्याची परिस्थिती काय ? आपल्या कार्यालयामार्फत या वर्षात किती रक्कम खर्च झाली आहे, त्याची कामनिहाय यादी तसेच त्या कामावर उपस्थित असलेल्या मजुरांची संख्या, गाव व नांवनिहाय, त्यांना दिलेल्या कामाचा मोबदला नगदी व धान्य स्वरुपात व हजेरीपटाची नक्कल. "
>
> सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांना हव्या असलेल्या माहितीचे वर्णन " रोहयो अंतर्गत झालेल्या कामाची हजेरीपटाची नक्कल " असे केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात आला नाही. अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक २९-०५-२००६ रोजी प्राप्त झाला. त्यावेळी जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना हे कार्यरत होते. अपिलार्थीने सदर अपील उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, घनसावंगी यांच्याकडे केले होते. अपिलार्थीने सदर अपील प्रत्यक्षतः चुकिच्या प्राधिकरणाकडे केले होते त्यामुळे सदर अपील उप विभागीय अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना यांच्या कडे पाठवावयास हवे होते. अपील अर्जावर त्यांनी अद्यापही कोणतीही कृती केली नाही. या अपिलामध्ये अपिलार्थीने आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी आज सुनावणीसाठी अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे यासंबंधातील म्हणणे नोंदवून घेता आले नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले. आयोगाकडे केलेल्या या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना त्यांच्या प्रथम अर्जामध्ये मागणी केलेली माहिती मिळण्यामध्ये अद्यापही स्वारस्य आहे. सदर माहितीसाठी त्यांनी १९-०४-२००६ रोजी अर्ज करुनही अद्यापही त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही, त्यामुळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) मधील तरतुदीनुसार कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००७ रोजी पोस्टाने ही माहिती अपिलार्थीस पाठविली

आहे, याप्रित्यर्थ त्यांनी आयोगास त्यांच्या कार्यालयाचे संबंधीत पत्र दाखविले. या पत्रातील माहितीचे अवलोकन करता यामध्ये दिलेला संदर्भ अपिलार्थीच्या अर्जासंदर्भातील नाही असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी यावर पुढे असा युक्तिवाद केला की सदर माहिती देण्याचे त्यांच्याकडून अनावधानाने राहून गेले व ते अपिलार्थीस येथून पुढे ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्यास तयार आहेत.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात, सरकारी यंत्रणा कोणत्या पातळीपर्यत अनादर व्यक्त करु शकतात याचे, हे प्रकरण म्हणजे मुर्तीमंत उदाहरण आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०४-२००६ च्या अर्जामध्ये, जो जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २१-०४-२००६ रोजी प्राप्त झाला, त्या अर्जातील माहिती अपिलार्थीस दिनांक २०-०५-२००६ रोजी देणे अथवा त्या संदर्भातील इतर काही निर्णय अपिलार्थीस देणे हे या कायद्याव्दारे अपेक्षित आहे. तथापि त्यांनी अद्यापही अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही व आपला कोणताही निर्णय अपिलार्थीस कळवला नाही.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती जरी मोठी असली तरी अपिलार्थीने जी माहिती मागितली आहे अशा प्रकारच्या माहितीचे नियमित संकलन प्रत्येक क्षेत्रीय यंत्रणा त्यांचे पातळीवर करत असते त्यामुळे अपिलार्थीस माहिती देणे हे मोठे जिकिरीचे काम होते असे आयोग मानत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये जन माहिती अधिकारी व अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्याकरिता त्यांचे जे इतर सहकारी जबाबदार आहेत त्यांना देखील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) अन्वये माहिती अधिकारी म्हणूनच संबोधण्यात यावे अशी तरतूद आहे. जन माहिती

अधिकारी यांनी मांडलेली त्यांची बाजू व युक्तिवाद ऐकता त्यांतील एकही मुद्दा या विलंबाचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत करु शकत नाही ही वस्तुथिती आहे.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती ७ दिवसात विनामूल्य देण्याची जन माहिती अधिकारी यांनी आता तयारी दर्शविली आहे हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना ही माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे इतर सहकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

या रकमेचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षाखाली करावा. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थनिक स्तर) विभाग, जालना यांनी यथायोग्यरित्या करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत पाठवावा.

सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी एकूण २ हप्त्यामध्ये भरावी. यापैकी पहिला हप्ता भरण्यासाठी अंतीम मुदत ३० नोव्हेंबर २००७ व दुसरा अंतीम हप्ता भरण्यासाठी अंतीम मुदत ३१ डिसेंबर २००७ अशी राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे इतर सर्व अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील निश्चित केलेल्या विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षाखाली एकूण २ हप्त्यामध्ये भरावी. यापैकी पहिला हप्ता भरण्यासाठी अंतीम मुदत ३० नोव्हेंबर २००७ व दुसरा अंतीम हप्ता भरण्यासाठी अंतीम मुदत ३१ डिसेंबर २००७ अशी राहील.

४. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीची विभागणी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थनिक स्तर), विभाग जालना यांनी यथायोग्यरित्या करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत पाठवावा.

५. वरील क्रमांक ३ च्या आदेशाचे अनुपालन होईल असे कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) जालना यांनी पहावे व आपला अनुपालन अहवाल दिनांक १५-०१-२००८ पूर्वी आयोगास पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, मु. पो. तालुका अंबड, जिल्हा जालना

२ ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, मु. पो. पावसेपांगरी, तालुका अंबड, जिल्हा जालना

३ श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, मु. आलमगाव, तालुका अंबड, जिल्हा जालना

४ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती